म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्ये
सं. क्र. १३४६
१५१६



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 29028 वि. काव्य
क्रमांक 93846 नों दि: 20/7/54

# जो गि या

● निवडक कविता ●

ग. दि. माडगूळकर

● किंमत साडेतीन रुपये

● प्रथमावृत्ति : १९५६

प्रकाशक :

**पंडित अनंत कुलकर्णी,**

कुलकर्णी ग्रंथागार,

१८६ शनवार पेठ, पुणें २.

मुद्रक :

**चिं. ग. वझे,**

साधना प्रेस,

३७४ शनवार पेठ, पुणें २.

* * *

वयाच्या सोळा-सतराव्या वर्षापासूनच मीं काव्यलेखनास प्रारंभ केला. उण्यापुऱ्या वीस वर्षांत, अधिकृत रीत्या प्रसिद्ध होत असलेला हा माझा पहिलाच काव्यसंग्रह. याहि संग्रहांत कालानुक्रम वा विषयवारी यांचें ओझें कवितांच्या उशापायथ्यास ठेवलेलें नाहीं.

अभिरुचि, मौज, सत्यकथा, किर्लोस्कर, मनोहर, स्त्री, वसंत, झंकार, अंजलि, लोकसत्ता, ज्ञानप्रकाश, लोकशक्ति, जनवाणी, साधना, समीक्षक, महाद्वार, दीपावली, शिरीष, छंद, भालचंद्र इत्यादि नियतकालिकांनीं या संग्रहांतील सर्वच कविता वेळोवेळीं प्रसिद्ध केलेल्या आहेत. या सर्व नियतकालिकांच्या संपादकांचा मी अत्यंत ऋणी आहें.

जीवनव्यवसाय म्हणून लेखणीशीं अनेकदां बेइमानी करण्याचा प्रसंग मजवर आला—येतो आहे. या संग्रहांतील कविता ही मात्र व्रतस्थपणें केलेली काव्यनिर्मिति आहे. या संग्रहाला ‘ जोगिया ’ असें नांव म्हणूनच द्यावेंसें वाटलें.

प्रा. ना. सी. फडके, श्री. व्ही. शांताराम, कविवर्य बा. भ. बोरकर, श्री. पु. भा. भावे ही ज्येष्ठ मंडळी नेहमींच माझ्या काव्यलेखनाचें कौतुक करीत आली. त्यांचें ऋण मला सदैव शिरोधार्य आहे.

माझ्या इतस्ततः परसलेल्या कविता एकत्रित करण्याचें कार्य श्री. सीताकांत लाड, श्री. ग. रा. कामत आणि माझा धाकटा भाऊ अंबादास माडगूळकर यांनीं केलें.

नवकाव्याचे आद्य प्रणेते आणि विद्वान् वाङ्मयशास्त्रज्ञ कविश्रेष्ठ कै. बाळ सीताराम मर्ढेकर यांनीं या संग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचें तीनचार वर्षांपूर्वींच मान्य केलें होतें. संग्रह आज प्रसिद्ध होत आहे, पण मर्ढेकर...?

माझ्या कल्पनेप्रमाणें त्यांची प्रस्तावना या संग्रहापेक्षांहि अधिक मोलाची झाली असती. कै. मर्ढेकरांच्या दोन ओळी 'प्रस्तावना' म्हणून या संग्रहांत घातल्या आहेत. या ओळी त्यांनीं श्री. ग. रा. कामत यांना लिहिलेल्या एका खाजगी पत्रांतील आहेत.

प्रकाशक श्री. पंडित अनंत कुलकर्णी यांनीं अत्यंत हौसेनें या संग्रहाचें प्रकाशन केलें आहे. त्यांच्या हौसेचें मोल आभारानें कसें होणार!

बलिप्रतिपदा शके १८७८
११, पुणें-मुंबई मार्ग
पुणें ३.

ना. द्वि. भाडभडणी

अनुक्रमांक २९०२८ वि:
क्रमांक ... १३०६ ... नों: दि:

## राहून गेलेली प्रस्तावना ......

माडगूळकरांचा कविता-संग्रह प्रसिद्ध होत आहे, हें वाचून आनंद झाला. प्रस्तावना लिहिण्याचें एकदां कबूल केलें होतें. आजहि तीव्र इच्छा आहे. पण कसें जमेल तें खरें. एक तर सध्यां माझा माझ्यावरचा विश्वास पूर्णपणें उडाला आहे. यापुढें कांहीं चांगलें-वाईट का होईना, पण आपल्याकडून लिहिलें जाईल असें वाटत नाहीं...माडगूळकरांच्या प्रसन्न काव्याला माझ्या प्रस्तावनेचें गालबोट म्हणजे मी स्वतःचे हात दाखवून अवलक्षण. पण इच्छा आहे...छापले जातील तसे फॉर्म जरूर पाठवावे. निदान चांगलें काव्य तरी वाचून होईल.

—बा. सी. मर्ढेकर

ता. ९ फेब्रुवारी १९५३

## ग. दि. माडगूळकर

यांचीं आगामीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | **वेग** आणि इतर कथा | कथा |
| २ | **चित्रगीतें** | गीतें |
| ३ | **परड्यांतील फुलें** | निबंध |
| ४ | **लपलेला ओघ** (दुसरी आवृत्ति) | कथा |
| ५ | **पांच चित्रकथा** | चित्रकथांचा संग्रह |

# जोगिया

## कवितानुक्रम


| विषय | पृष्ठ | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ जोगिया | ९ | २५ अफूचीं फुलें | ४६ |
| २ आईच्या ओव्या | ११ | २६ इस्पितळ | ४८ |
| ३ तेवढें सांगा ना गडकरी | १३ | २७ निर्मल जीवन | ४९ |
| ४ काव्यानंद | १५ | २८ कृष्णाकाठीं | ५१ |
| ५ शाश्वतत्रयी | १७ | २९ श्रीगणेशाय नमः | ५३ |
| ६ संन्यासिनी | १८ | ३० गृहसाम्राज्य | ५४ |
| ७ जत्रेच्या रात्रीं | १९ | ३१ महात्म्या | ५५ |
| ८ डफा नको हें पाप | २१ | ३२ आम्ही महात्म्याचे चेले | ५६ |
| ९ संताची सुगी | २२ | ३३ नका थांबवूं इथेंच दिंडी | ५७ |
| १० प्रणयशारदे | २३ | ३४ आसरा | ५९ |
| ११ भास | २६ | ३५ नवल | ६५ |
| १२ पूजास्थान | २७ | ३६ मायाविनी | ६६ |
| १३ माझे दिपले गा·डोळे | २९ | ३७ भावकोमलता | ६७ |
| १४ चंदनाचा सन्मान | ३० | ३८ राज्याभिषेक | ६८ |
| १५ सरिता सागर | ३१ | ३९ मृग | ६९ |
| १६ प्रणयाची प्रभात | ३३ | ४० अतिवृष्टि | ७१ |
| १७ कोंकरू | ३५ | ४१ ओसाड रानांत | ७२ |
| १८ माझा गांव | ३७ | ४२ फूल नाहीं फुलाची पाकळी | ७४ |
| १९ माझा चष्मा | ३९ | ४३ शपथ | ७५ |
| २० अगतिक | ४० | ४४ तुझं गुपित | ७६ |
| २१ नवकाव्य | ४१ | ४५ शापच कीं वरदान | ७७ |
| २२ Rummy | ४२ | ४६ अखेरची सलामी | ७९ |
| २३ नवा आनंद | ४३ | ४७ वसंतराणी | ८० |
| २४ गोंधळ | ४५ | ४८ टाहो | ८२ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| ४९ दरडीवर | ८४ |
| ५० मोक्षाची वाट | ८५ |
| ५१ रानांतली अंगाई | ८६ |
| ५२ असंतोष | ८७ |
| ५३ शान्तिसूक्त | ८९ |
| ५४ पुरुषसूक्त | ९१ |
| ५५ परिस्फोट | ९३ |
| ५६ द्राक्षवेल | ९५ |
| ५७ मूर्तिभंग | ९७ |
| ५८ मोक्षगर्भा | ९८ |
| ५९ अजूनही तूं तीच आहेस | ९९ |
| ६० चोरबाजार | १०० |
| ६१ घे तसला अवतार | ११२ |
| ६२ वसंत व्यापारी | ११४ |
| ६३ कविताशाखेवरी वाल्मिकी | ११६ |
| ६४ कायाकल्प | ११८ |
| ६५ साताऱ्याची तऱ्हा | १२१ |
| ६६ मेघदूत | १२३ |
| ६७ सह्या जाहल्या तहनाम्यावर | १२४ |
| ६८ युद्धानंतर | १२६ |
| ६९ विसरतां विसरेना | १२७ |
| ७० अघटित | १२९ |
| ७१ माझ्या समाधीवर | १३३ |
| ७२ एक पांखरूं | १३४ |


## संगीतिका


| | |
|---|---|
| १ अमृतवृक्ष | १३७ |
| २ व्याध | १४९ |


* * *



आई,

तुझ्या गीतगंगेतील, एक भरली कळशी

# जोगिया

★

कोन्यांत झोपली सतार, सरला रंग,
पसरलीं पैंजणें सैल सोडुनी अंग,
दुमडला गालिचा, तक्के झुकले खालीं
तबकांत राहिले देठ, लवंगा, सालीं.

झुंबरीं निळ्या दीपांत ताठली वीज
कां तुला कंचनी, अजुनी नाहीं नीज ?
थांबले रसिकजन होते ज्याच्यासाठीं
तें डावलुनी तूं दार दडपिलें पाठीं.

हळुवार नखलिशी पुनः मुलायम पान,
निरखिसी कुसर वर कलती करुनी मान
गुणगुणसि काय तें ?– गौर नितळ तव कंठीं–
स्वरवेल थरथरे, फूल उमलतें ओठीं.

साधतां विड्याचा घाट उमटली तान,
वर लवंग ठसतां होसि कशी बेभान ?
चित्रांत रेखितां चित्र बोलले ऐने,
" कां नीर लोचनीं आज तुझ्या ग मैने ? "

त्या अधरफुलांचे ओले मृदुल पराग–
हालले, साधला भावस्वरांचा योग,
घमघमे जोगिया दंवांत भिजुनी गातां
पाण्यांत तरंगे अभंग वेडी गाथा.

" मी देह विकुनियां मागुन घेतें मोल,
जगवितें प्राण हे ओपुनियां ' अनमोल ',
रक्तांत रुजविल्या भांगेच्या मीं बागा,
ना पवित्र देहीं तिळाएवढी जागा.

शोधीत एकदां घटकेचा विश्राम
भांगेंत पेरुनी तुळस परतला श्याम,
सांवळा तरुण तो खराच ग वनमाली
लावितें पान... तों निघून गेला खालीं.

अस्पष्ट स्मरे मज वेडा त्याचा भाव,
पुसलेंहि नाहिं मीं मंगल त्याचें नांव;
बोलला हळू तो दबकत नवख्यावाणी
'मम प्रीती आहे जडली तुजवर राणी!'

नीतिचा उघाडिला खुला जिथें व्यापार
बावळा तिथें हा इष्का गणितो प्यार;
हांसून म्हणाल्यें, 'दाम वाढवा थोडा...
या पुन्हां, पान घ्या...', निघून गेला वेडा!

राहिलें चुन्याचें बोट, थांबला हात,
जाणिली नाहिं मीं थोर तयाची प्रीत,
पुनःपुन्हां धुंडितें अंतर आतां त्याला
तो कशास येइल भलत्या व्यापाराला?

तो हाच दिवस हो, हीच तिथी, ही रात,
ही अशीच होत्यें बसलें परि रतिक्लांत,
वळुनी न पाहतां, कापित अंधाराला
तो तारा तुटतो—तसा खालती गेला.

हा विडा घडवुनी करितें त्याचें ध्यान,
त्या खुळ्या प्रीतिचा खुळाच हा सन्मान;
ही तिथी पाळितें व्रतस्थ राहुनि अंगें
वर्षांत एकदां असा 'जोगिया' रंगे."

* * *

# आईच्या ओव्या

मांडीवर जोजवितां मुकें भविष्य पुराण
आज अचानक आली आई, तुझी आठवण
आठवणींत ओवीचा गावतांच शिलालेख
डोळ्यांतुन ओघळला उपकारांचा आलेख
आलेखाचा आविष्कार आपोआप झाला ओठीं
धांवल्या ग तुझ्या ओव्या गीत माझें गाण्यासाठीं
गाण्यासाठीं माझ्यापाशीं नाहीं साळुंकीचा साद
शुद्ध भक्तीनें तरीही आला गाण्यांत प्रसाद !

प्रासादिक माझी वाणी झाली अमृतवर्षिणी
आणि सदेह मी आलों अंकीं तुझ्या बाळपणीं
बालपणांतलें आलें रम्य खेड्यांतील घर
भल्या पहांटें जात्याची आंत सुरू घरघर
घरघर चालू झाली दोन पाषाणांची साथ
जीवनाच्या चक्रासह चाले तुझें भावगीत
गीत ऐकत केला मीं डाव्या मांडीचा पाळणा
न्याहळत न्याहळत तुझ्या मुखाचा खेळणा !

खेळण्यांत गुंतलों मी मित्रांसवें अंगणांत
दुडदुडतें कोकरूं धरीलेंस बगलेंत
बगलेच्या उबेंतून खालीं घेऊनीया उडी
धांवलों ग तुरुतुरु गांठावया सवंगडी
सवंगड्यासम तूंही धांवलीस चांदण्यांत
धांवल्याला भरविला मऊमऊ दहीभात
दहीभात जड झाला माझ्या इवल्या पोटांत
डोळे लागले झांकाया गीत भरलें कानांत



अनुक्रम २९०२८ वि:
क्रमांक नों: दि:

कानांवर गीत तुझें गोड बांगड्या वाजल्या
रानांतल्या गाई मला 'दूदू' देऊनीया गेल्या
गेल्या गाई आला काऊ आला कुत्ता आली माऊ
वळचणीच्या चिमण्या माझ्यासंगें आल्या जेऊं
जेऊं घातलेंस मला उरांतल्या अमृतानें
कान भरविले माझे तुझ्या मधुर सादानें
सादानें त्या वाढविली माझ्यासंगतीं कविता
माझ्यासंगें थोर झाली तुझ्या गाण्याची दुहिता !

दुहिता ती आज झाली जन लोकां आवडती
'तुझ्या लाडक्या लेकाची थोरामोठ्यांत बढती
बढतीचा बढीवार तुझ्या वाहतों पायांशीं
तुझ्या गीत-गंगेंतील एक भरली कळशी
कळशीच्या तीर्थावर झालों आजन्म पावन
जिथें जिथें वंद्य कांहीं तिथें तुझेच चरण
चरणाची धूळभेटी व्हावी माझिया कपाळां
जन्मभरी ती लाभावी आस एवढीच बाळा !

बाळासाठीं आई, तुझा जीव संसारीं गुंतला
भक्तासाठीं पांडुरंग उभा मुक्यानें राहिला
प्रौढपणीं झालों आज तुझ्यापासुनिया दूर
तुला भेटायासी परी जीव जाहला आतुर
आतुरला माझा जीव रमे पाडसांत माझ्या
खेळवितों, जोजवितों नातवंडांलागीं तुझ्या
तुझ्या वडाचा विस्तार आज केवढा वाढला
शाखा पारंब्या बांधती तुझ्या नांवाचा इमला !

इमल्यांत नांदतील, अशा पिढ्यावर पिढ्या
सजवितील संसारां, राघू चिमण्या बोबड्या

* * *

# तेवढें सांगा ना गडकरी

मायबोलिचा किल्ला आतां द्यावा कोणां करीं ?
तेवढें सांगा ना गडकरी— !

साहित्याच्या सह्यगिरीची छाती खचली पुरी
तयाला कोण कसा सांवरी ?

आद्यकवींचीं पांडवलेणीं उलूं लागलीं उरीं
भंगतें शिल्पच वरचेवरी !

सैन्याशीबंदी उरली नाहीं, दुबळी देशमुखी
जाहली अर्थासी पारखी !

परभाषेचे कुणी ऋणाइत लटक्या जोरावरी
सांगती हुकमत किल्ल्यावरी !

कशि राज्यलक्ष्मी राहिल येथुन पुढें ?
काशि मऱ्हाटशाही नांदावी चहुंकडे ?
अन् दुनियेंत घुमावे कीर्तीचे चौघडे ?

दिक्कालांतुन बघा शाहिरा दिसतो का तो तरी
आपुल्या वारस गादीवरीं !

कवि कृष्णांची शककर्ती ती तेजस्वी लेखणी
धरावी आतां हातीं कुणीं ?

कुळवंताचें बाळ दिसेना, सारे परक्या घरीं
राहिले हुजरातिंत नौकरीं !

भावबंधनीं राष्ट्र जखडुनी, सौख्याशा लाविली,
प्रयाणा वेळ तुम्हीं साधली ?

दोन तपांचीं वर्षें गिळलीं काळानें त्यावरी,
कुणी ना निपजे तुम्हांपरी ?

या तुम्हीच आतां फिरुनि जगीं शाहिरा !
घ्या स्कंधीं आणि कार्याची या धुरा !
हा काव्यसुधेनें कटाह सारा भरा !

अभंग सेवेसाठीं तुमच्या आसुसला अंतरीं
भुकेला भीमातीरीं हरी !

* * *

# काव्यानंद

अंगणांतल्या शिरिषाखालीं
रजतरसाचें रम्य चांदणें;
तरल विरलशी पडे सावली,
दृश्य मुलायम लोभसवाणें.

संमार्जित या भूमीवरती
नक्षी रेखुन पडछायांची,
नवा गालिचा किरणें विणती;
बैठक माझी ही भाग्याची.

ऐन भरानें याच ठिकाणीं
एकलकोंडी झडते मैफल;
प्रीतिरसाची गातों गाणीं
मद्यासम जीं मादक शीतल.

उर्दूमधलें फुलतें यौवन,
तंग मलमली वेष वेगळा;
कडकडुनी तें देतां चुंबन
अननुभूत तो स्वाद निराळा!

गीर्वाणांतिल कमललोचना
हृदयावरती मान ठेवितां,
तृप्त होतसे सहज कामना
कचपाशांतिल गंध सेवितां!

गव्हाळ कांती, खळ्याळ डोळे,
उरोज उन्नत, वर्ण सांवळा,
करडी बोली, भाव कोंवळे,
मराठींतला ठोक सोहळा.

कल्पनेंतली दिव्य आर्तता,
शब्द तिलाही जाती लंघुन ;
आंग्लसुंदरी जवळीं बसतां
अशक्यताही बिलगे रंगुन.

काव्यसुरेच्या या कैफांत
झुकूं लागती सहज पापण्या ;
वेष बदलुनी अन् स्वप्नांत
पुनश्च येती राजस राण्या.

निद्रा, जागृति किंवा धुंदी
कवितेवांचुन साधत नाहीं ;
आजन्माची अशी समाधि
खोड जिवाची जातच नाही.

भोगांवांचुन काय कळावी
या सौख्याची मादक माया ?
उपहासूनी म्हणती मज जन
' झिंगतोच हा वेडा वायां ! '

* * *

# शाश्वतत्रयी

रानफुलें सभोंवार मधें सुरेची सुरई
स्वाद घेतों मी एकला संगतीस कोणी नाहीं.

चंद्रालागीं निमंत्रिलें करावया सहपान
आणि सावली माझीच आतां झालों तिघेजण.

चंद्र मुलखावेगळा नाहीं शिवत मद्याला
सज्ज सावली तेवढी साथ कराया मजला.

मला सुखांत पाहून चंद्र डोलवितो मान
बेहोष या देहासंगें छाया देते आंदोलन.

संगें संगें जातों आम्ही तिघे किंचित शुद्धींत
जातां कैफाच्या राज्यांत पुन्हा वेगळाले पंथ.

वरी नभांत चंद्रमा इथें मद्यपि बेभान
धरेवरी पडछाया छान साधला त्रिकोण !

शब्दशून्य त्रयी ऐसी आतां रहावी शाश्वत—
चालो जगीं महायुद्ध होवो मानव्याचा अंत !

* * *

# संन्यासिनी

नयनाभंवतीं काळीं वलयें ज्वानी ओसरली
गालावरची लाली ईषत् धवळूनी आली !

छातीवरच्या तारुण्याची ओघळली माया
हंसगतीवर प्रौढपणाची पडली पडछाया !

वेणीमधल्या बकुलफुलांचें झालें निर्माल्य
कर्णफुलांचीं वेजें दावितिं स्मृतींतलें बाल्य !

गालावरच्या खळींत तरळे घर्माचा बिंदू
नाममात्र कां उरला मागें सौख्याचा सिंधू ?

भाळावरती रुतल्या रेघा चढल्या चिंतेच्या
खुणा जणूं या दुर्दैवाच्या निष्ठुर घावांच्या !

घेतां वरती हात जरासा कंकण हो मागें
कोंपरास तें जाउनि भिडतें कसल्या अनुरागें ?

अनुरागाच्या धुंदीमाजी याच कोपरानें
प्राणसख्याचा देह कवळिला असेल प्रीतीनें !

संन्यासिनि ही नव्हेच रसिका कसल्या धर्माची
हिला न ठाउक प्रीतीवांचुन नीती जगताची !

सरे समाधी, दर्शन झालें आणि अकस्मात्
प्रीतिजगाचा ईश्वर झाला अनंतांत गुप्त !

विरहव्यथेनें करपुन गेलें जीवाचें रान
भाळावरती एकच उरली हिरवी ही खूण !

तिरपे डोळे करुनि छेडतां तिजसी काय वृथा ?
विरक्तिमागें संसाराची लपली शोककथा !

कळली शंका, हरितांकुर कां पुन्हा न बहरावा ?
सौभाग्याचा लाल फुलोरा कां नच फुलवावा ?

नकाच आणूं मनांत असलें वेड्यापरि कांहीं
शुद्ध प्रीतिच्या आर्यव्रताला अन्य देव नाहीं !

* * *

# जत्रेच्या रात्रीं

दुणावून लय स्वरांत चढल्या शिरते सुरते गडी,
सुरावट भाषेहुन रांगडी.

डफदिमड्यांची गरम जाहली कडाडुनी कातडीं,
पुढें ये सोंगाड्या सोंगडी.

शीळ चढवुनी केली त्यानें कल्लोळावर कडी,
उडविली सुरत्यांची वावडी.

झरझरा उतरली वाद्यांची तों लय,
पोंचला शिगेला श्रोत्यांचा विस्मय.
वाजले चाळ अन् तालावर थक्थय,

कंबर लचकत येइ छोकरी छेलाटी गुलछडी
अंगलट भुंवईसम वाकडी.

झडल्या टाळया, शिट्या, अरोळ्या, वर चवल्यांच्या झडी,
स्वीकरी मुजऱ्यासह फाकडी.

हिरवें पातळ, हिरवी चोळी, वरी चमकते खडी ,
छातीवर मोत्यांच्या दुल्लडी.

नथणीखालीं हलूं लागली अधरांची लालडी,
वाहिली रसगंगा दोथडी.

कुणि गालावरच्या खळींत बसले दडून,
कुणि ओठ चाविले आपुलेच कडकडून,
कुणि पदरामागिल करवंदें घे खुडून.

खमिजावरि तों कुणीं ठसविली तिच्या चोळिची खडी
कुणितरी कातरली काकडी.

स्वप्न समोरी, स्वप्न अंतरीं, रतले, भुलले गडी,
चालली घडीमागुती घडी.

नाहिं उमगलें घुसल्या केव्हां जत्रेच्या झुंबडी,
बाजुची कनात हो ऊघडी.

मधेंच आली मधीं चांदणी शुक्राची चोंबडी,
रेकलीं वेड्यापरि कोंबडी.

जाहले पुसट तों वेळूंवरचे दिवे,
ती इष्कबाजिची ज्योतीही मालवे.
जागींच राहिले बसुन जनांचे थवे,

कशी संपली रात कळेना इतक्यांतच तोकडी,
रिचवितां ताडीच्या कावडी.

* * *

# डफा, नको हें पाप !

‘ तूं–मी ’, ‘ तूं–मी ’ करिती वाद्यें, डफा ! नको हें पाप
कवनासंगें नव्या पडूं दे तुझ्याच पाठीं थाप !

चढव आपुला साद, उडव चल वाऱ्याचा थरकांप
साथीसाठीं रानपांखरें मिसळुं देत आलाप !

एकलव्य मी भिल्ल भाबडा तूं तर माझें चाप
हवा कशाला तुला–मला या पौरजनांचा ताप ?

हिंस्र श्वापदें असतिल तेथें अखंड उठवूं रान
पुरतें निर्भय करुनी सोडूं जंगलचें संतान !

मर्दपणाचें जिण आमुचें, मणिबंधीं संसार
शर तेजाचे मारुन निखळूं रानांतिल अंधार
शब्द हवा त्या देऊं आपण मायेनें फलहार
काडीवांचुन बुडणाऱ्याला शक्तीचा आधार !

कधीं विसावा, तुला फुलांचा चढवुनिया शिणगार
रसराजाच्या राउळांत मी मुक्तनृत्य करणार
तऱ्हा रासवट तरी आपुलें सेवाव्रत निष्पाप
आत्मानंदें भरूं शिगोशिग या जन्माचें माप !

‘ तूं–मी ’ ‘ तूं–मी ’ करिती वाद्यें डफा ! नको हें पाप
कवनासंगें नव्या पडूं दे तुझ्याच पाठीं थाप !

* * *

# संताची सुगी

संसारीं मीं केला,
तुळशीचा मळा
करदा सांवळा
पांडुरंग.

कृपा-वापीवरी
चालवितों मोट
खळाळती पाट
वैराग्याचे,

बैल होउनिया
वेद राबताती
निंदणी करीती
श्रुति-स्मृति.

डोलांत डोलती
सांवळ्या मंजिरी
फळाची अंतरीं
आस नाहीं.

बारमाही येथें
चालला सुकाळ
येवो कळिकाळ
आदरीन.

जन्म-मरणाची
मज नाहीं भीती
जिंके माझी शेती
मोक्षालाही.

* * *

# प्रणयशारदे

ऐकविलें मेघदूत
        शब्द शब्द उकलून,
अंगीं वसंत मातला
        कळि-कळि उमलून,

रानांतल्या झोपडींत
        उभा केलास प्रासाद,
तुझ्या बोलांत डोलले
        सखि ! वीणेचे निनाद,

तेवूं लागले भोंवतीं
        रत्नदीप असंख्यात,
निळ्या निळ्या प्रकाशांत
        माझा स्पर्शिलास हात,

असें कांहीं पाहिलेंस
        माझ्या स्नेहाळ डोळ्यांत
अभावित कीं सर्वस्व
        तुझ्या गावलें मिठींत,

नयनांचीं, कपोलांचीं
        माझ्या घेतलीं चुंबनें,
गेलीं तुटलीं बापडीं
        जननीतीचीं बंधनें,

तुझ्या रसाळ वाणीचा
        घेतां अनंत आस्वाद
घडायाचा तो घडला
        आणि शेवटीं प्रमाद,

होती पहांट झेलीत
        दंवबिंदू पाकळ्यांत,

ओठंगले आनंदाश्रू
        तुझ्या-माझ्या लोचनांत,

काव्य बोललों, जगलों
        जागविली एक रात,

केला वाणीचा उत्सव
        दोघांच्याच दुनियेंत.

हाय ! फुटतां पहांट
        लुप्त काव्याची नगरी,

नीतिभ्रष्ट होऊनिया
        आलों दोघेहि बाहेरीं.

तुझ्या-माझ्या डोळ्यांपुढें
        आतां मत्सराचें जग,

जलाशयांत करीती
        नीलोत्पलें तगमग.

झाला निस्तेज चंद्रमा
        गेल्या लोपून तारका,

तुझ्या–माझ्या देहावर
        फिक्या प्रणयाच्या रेखा.

काल रात्रींचें संगीत
        कुठें दडलें भूमींत,

हृदयांत दबलें ग
        तुझें-माझें भावगीत.

ठेवूं असेंच उरांत
        काव्य अबोध सुंदर,
नव्यानेंच आरंभितें
        जुनें जग व्यवहार.

नको ओलावूं ग डोळे
        माझ्या प्रणयशारदे,
निशिगंधाचें हें लेणें
        तुझ्या डोईंत खोवूं दे.

तुझ्या-माझ्या मीलनाचें
        हेंच एक उपमान,
शुभ्र तरीही विनाशी
        प्रीत माझी नीतिहीन.

काव्यसंकेत भेटवी
        पक्षिणीला चक्रवाक
प्रातःकालीं दुरावली
        तुझी-माझी आणभाक.

★ ★ ★

# भास

शुभ्र रुजामा राजमहालीं
ठसे उमटती त्यावर कैसे ?
रक्तमाखल्या शीघ्रगतीनें
कोण येतसें ? कोण जातसें ?

चिडल्या माथीं, कण्हते चिंता
झोंप जागती झोपूं पाहे
तोंच कुणाची ये भूपाळी :
' वैष्णवजन तो तेणे कहिए '

निर्बंधांच्या शिकारींतले
मेजावरती न्यायनिवाडे
कोण पालथे घाली कागद
वरीं ठेवुनी तीन माकडें ?

विरोधकांच्या आवाजावर
शब्दवेध घे झेप स्वैरसा
टणत्कार तो धनुष्य करितें :
' सत्य अहिंसा, सत्य अहिंसा ! '

प्रासादाच्या पुढें प्रजाजन
अन्नासाठीं करिती गिल्ला
सरत्या कोठाराच्या कोनीं—
खजूर उष्टा दिसे सांडला.

घरचें झालें थोडें आतां
कुणीं पडावें परक्या पापीं
खुंटीवर पण दिसे सारखी
बुरसटलेली गवती टोपी.

या भासांनीं फसतों आहें
कसें करावें राज्य कळेना,
वळूंच म्हणुनी विचार हाले
पाय चलेना, हात वळेना.

* * *

# पूजास्थान

त्या बकालं शहरीं सकाळ कसली सांगूं ?
लागली भराभर रहदारी पण रांगूं,

उघडल्या लबाड्या, सुरू जाहल्या पेढ्या,
चालतीं पाउलें, सुरू विजेच्या गाड्या.

सरपटत निघावी सांदीमधुनी गोम
गर्दींत चालली तशी अजागळ ट्राम,

खडखडत आपुले सहस्र फिरते पाय
ती वळणावरती वळत वाकडी होय.

वेगास अचानक आली कसली सुस्ती,
बुचबुचे भोंवतीं ओंगळवाणी वस्ती.

अप्सरा रात्रिच्या मजल्यावर वा खालीं
मिरविती कालच्या रंगामधली लाली.

थांबली ट्राम, हो कांहींतरि अपघात
कुणि रती चमकली वरी घांसतां दांत.

कुणि केस उसकितां चकित बोलती झाली :
" हा, मुकें जनावर मेलें ट्रामेखालीं ! "

त्या जनावराच्या मरणीं कुठलें लक्ष ?
औत्सुक्य चोरटें अवघ्या नयनीं दक्ष

टकमका पाहती वखवखलेले नेत्र
' हें असेल दिसलें काल कसें रे पात्र ?'

ट्रामेंत त्याच कीं बसलों होतों मीही,
लाखांत एक मी कुणी वेगळा नाहीं.

मी खिडकीमधुनी निरखित होतों राण्या–
शृंगार शिळा तो, उसकटलेल्या वेण्या.

ते चुरगटलेले, उदासलेले वेष,
ते पलंग, गिरद्या, संसारांचे नाश;

तीं आंत टांगलीं उभीं नागडीं चित्रें,
थुंकल्या विड्यांनीं रंगविलेले पत्रे;

ती कुरुपतेंतिल क्षुद्र बेगडी कांती,
पडुनियां गिलावा भकासलेल्या भिंती;

ती विटंबनेंतिल आनंदाची नीति,
ती दिडकीसाठीं रंगविलेली प्रीती !

–हालली ट्राम तों पुढें जराशी झाली
अन् डोळ्यांपुढती नवीच खिडकी आली.

पाहिलें दृश्य तें पुन्हा सांगवत नाहीं
रोमांच तरारुन कांटा भरला देहीं.

सुस्नात एकली तरुण त्यांतली पोर
नेसली पांढरें, लाल कपाळीं कोर.

ये हळदीकुंकू घेउनिया तबकांत
खिडकीस पूजुनी तिनें जोडिले हात.

हा पूजा–विधिचा अघोर कीं अपमान !
ती खिडकी का कधिं होइल पूजास्थान ?

' दे अन्न तयाची करितो मानव पूजा ! '
कानांत ओरडे विचार माझा माझ्या.

चालली ट्राम अन् क्षणांत आला वेग,
मेंदूंत राहिली जळत वांकडी रेघ.

विझवील काय ती कुण्या कवीचें ज्ञान ?
हें असेंच का हो जन्मे पूजास्थान ?

* * *

# माझे दिपले गा डोळे !

देव पुंडलीक झाले, ब्रह्म भक्तीचें भेटलें
आला राउळीं चढून, चोख्यामेळ्याचा पाषाण
देव उतरले खालीं, जिव-शिव भेटी झाली
हरी, हरीजन धाले, भेद यातींचे संपले

आतां नुरे यातिगोत, धर्म एक भागवत
मोक्षमार्गाची माउली, चंद्रभागा संतोषली
तीर्थीं नाहताती संगें, शुद्ध-मळीणांचीं अंगें
सानें समत्व बाहिलें, श्रेष्ठ सानपणा ल्याले

भीवरेच्या वाळुवंटीं, झाली वैष्णवांची दाटी
ज्ञानियांची ज्ञानेश्वरी, नाचे अज्ञानांभीतरीं
शुद्ध समता वर्तली, मूढ अहंता खंडिली
जन थोरले सानुले, एक्या पंगतीं जेवले

सर्वांभूतीं रंगे देव, देई कवित्वासी खेंव
दृश्य पाहिलें आगळें, माझे दिपले गा डोळे !

* * *

# चंदनाचा सन्मान

चंदनी चिंतत, जळाला चंदन
सुगंधें भरून, मर्त्यलोक

चंदनाचा वंश, जाहलासे धन्य
अबोल जळून, संतांसंगें

युगापरि युगें, झिजला चंदन
सेवक होऊन, भारताचा

परि त्याचे शिरीं, घालुनियां घाव
भोगिती मानव, सौरभासी

अवयव त्याचे, छेदून घासून
करिती लेपन, शरीरासी

मृत चंदनाच्या, कोरुनिया अस्थि
कला मिरविती, कलावंत

अस्थिकण त्याचे, आगींत जाळून
धूपदानें पुण्य, जोडिताती

धनिकांच्या चिता, चंदनें रचून
वरी अपमान, नित्याचाच

पिढ्याच्या सेवेचा, अमोल सन्मान
आला रे घडून, आपोआप

चंदनासी चिता, लाभली अस्थींची
अमर वज्रांची, महात्म्याच्या

संताचिया अंस्थी त्रिखंड पावन
जळाला चंदन, त्याच्यामाजीं.

★ ★ ★

# सरिता–सागर

सरिता :—

सागरा, देई हृदयीं ठाव
गिरीदरींतुन शोधित आल्यें तुझ्या प्रीतिचें गांव !
निज जनकाच्या असतां गेहीं
मेघ पाहुणे येत प्रत्यहीं
मुखें तयांच्या प्रथम ऐकिलें, तुझें उदारा, नांव !
तुझ्या कीर्तिच्या मूर्त पताका
जीवनदायी श्रावणरेखा
सर्वांगावर केला त्यांनीं संजीवक शिडकाव !
नांव ऐकिलें, कीर्ति ऐकिली
मूर्ति नव्हती जरी पाहिली—
उन्मीलित या तरुण मनाचा, तुजवर जडला भाव !

सागर :—

खरोखर, वेडी तूं सजले
वैराग्याच्या प्रीतीसाठीं शिणविलींस पाउलें
जीवन माझें जगतासाठीं
उगा धांवलिस माझ्या पाठीं
असेंच पूर्वी कैक जणींनीं जीवन मज वाहिलें
जीवानें माझ्या खुळ्या मिळाल्या
रविकिरणांनीं पार जळाल्या
स्वत्वासह मीं प्रेम तयांचें विश्वास्तव होमिलें
माझ्या घरचे माणिकमोतीं
धनी तयांची मानवजाती
नको भणंगासाठीं शिणवूं काया निज निर्मले !

सरिता :—

किती थोर तूं प्रिया, प्रियकरा !
आकळिलें मी तुझ्या अंतरा
कैक मुखानें ऐक बोलते झाले माझे भाव !
कैक मुखांनीं तुला चुंबितें
कैक वार अन् मरण साहतें
क्षुद्र जीवनां पोटीं घेवो, तुझी महासुर माव !

निवेदक :—

मीनली सागरीं आणि सरिता गुप्त जाहली
प्रकृति पुरुषामाजी मिळाली धन्य जाहली

* * *

# प्रणयाची प्रभात

चांदपांखरूं वरीं तरळतें स्थिरावुनी पंख
लहरीलहरीवरी जळाच्या चंदेरी झांक

रातवल्लरी हळू उघडती मिटलेले डोळे
रातराणिवर गंधमधाचें थवथवलें पोळें

मावळतीचे शीतळ वारे भृंगसंघ झाले
ओठिं लाविती निशिगंधाचे उभट शुभ्र पेले

पायीं टाकुन निज छायांचीं पांघरलीं वसनें
उमदे उमदे वृक्ष गुंजती प्रणयाचीं कवनें

प्रणयी हृदयां व्यवहारांतुन आणाया जाग
रातकिड्यांची साद देतसे उच्चरवें बांग

घराघरांतुन जागे झाले प्रीतीचे जीव
नयनांमधले, हृदयावरचे फुलुनी राजीव !

खिडकीमधुनी आंत सांडतां तुषार तेजाचे
विझले दीपक, जळते साक्षी बुडल्या सूर्याचे !

पराजिता हो शयनिं मानिनी खव्याळ झुंजार
पाठीखालीं पार चुरडला मुक्त अलक भार !

आढेवेढे घेत नवोढा पडल्या करपाशीं
मदालसांचे राग कोंडले भिडतां ओंठाशीं

नव्या किशोरी भरूं लागल्या स्वप्नावर रंग
शय्येवरती सळसळ करिती कवळे उत्संग !

मदनयोगिनी कुणी कंचनी हिरव्या माडींत
कथाकीर्तनीं रंगुन गेल्या, नूपुर घुमतात !

अभिसाराचें वाण घेउनी कुणीतरी नार
चांदण्यांतुनी दूर चालली नगराच्या पार



21028

खिडकीखालीं कुणी घालतो शिलेदार शीळ !
माडीवरती उभी कुमारी मत्त उतावीळ !

प्रणयप्रभातीं असे रंगले अवघे व्यवहार
नाहीं कोठें घोर प्रखरता नाहीं अंधार !

तरंगतें वर चांदपांखरूं; प्राणविश्व खालीं
चांदपांखरावरी असावी मदन-रती बसली ! !

* * *

# कोंकरूं

भूक लागली प्राण पोंखरूं
हुंदडण्यांतील सरली गंमत
अंगाभंवतीं फिरे कोंकरूं
मर्यादांची जाचक संगत !

लंघुन जातां कांटे–कुंपण
तिथें डंवरल्या प्रकाशवेली
मंडप त्यांचे वनास भूषण
कवळीं पानें वरतीं नटलीं.

त्या वेलींवर लावुन डोळे
धजे कोंकरूं तोडूं कुंपण
जन्मजात तें वेडें भोळें
उंच उभारी बुटकें ‘ मी ’ पण.

उभें मागल्या पायांवरती
झुंज देइ तें कांट्यांसंगें
कुठली सुटका येते हातीं ?
रक्तानें तो प्रयत्न रंगे.

रक्त माखलें, तोंड चिमुकलें—
मात्र पोंचलें सीमा तोडुन
आंत कांपरें अंगा भरलें
जीभ घेतसे ‘ दुर्लभ ’ ओढुन.

तळपानांच्या निबर शिरांनीं
चिरली नाजुक जीभ कोंवळी
अशक्यतेचें वारें कानीं
तीव्र भुकेच्या संकटकाळीं.

मारक तितकें आलें तोंडीं
तारक त्याप्रत पुरे न उंची
सजीवतेची उरे हुडहुडी
देह कांपरी हो घडवंची.

घडवंचीसम बसलीं पाठीं
तशांत काळीं कुणी पांखरें
लचके तोडुन भरती पोटीं
उरलें सुरलें जिवंत वारें.

सीमेवरती मरून गेलें
भुकेजलेलें मुकें कोंकरूं

*    *    *

—ऋतू बदलले—कांटे कुजले
—आणि लागले वेल मोहरूं.

* * *

# माझा गांव

नजिक नाझरें श्रीधर कविचें, नदी माणगंगा
नित्य नांदतें खेडें माझें धरुनि संतसंगा
तिळही नाहीं खेड्याला या पहिला इतिहास
शिल्पकलेची ताम्रपटाची कशास मग आस ?

इथें न नांदे शिवशाहीचा संबंधीं वंश
गर्व-सर्प या करूं न शकला ओझरता दंश !
निळा जलाशय नाहीं येथें, नाहीं उद्यान
अन्नासाठीं मात्र हिरवळे भंवतीचें रान !

अधुनिकतेचा नाहीं येथिल वास्तूंना वास
धाब्यावरती घरें बसविती उन्हा-पावसास
कष्टासाठीं दिवस येथला येतो उदयास
रात येतसे थकलेल्यांना निद्रा देण्यास

जाति जमाती इथें जन्मती सुखें नांदण्यास
पिरास करतो नवस मराठा, मियां मारुतीस
मायबोलिहुन नाहीं दुसऱ्या भाषेला वाव
व्याकरणाविण इथें बोलती हृदयाचे भाव !

नाडित नाहीं अज्ञानांना पदोपदीं ज्ञान
अनुभव आणिक वार्धक्याला मात्र इथें मान
न्यायासाठीं पांच मुखांचा परमेश्वर बोले
गांवामागुन इथें व्यक्तिची निर्भयता चाले

अवजड मोटा खिलार खोंडें सहज ओढतात
अवघड ओझें संसाराचें तरुण वाहतात !
थकले नंदी अलगद नेती खडकांतुन गाडी
म्हाताऱ्यांचा अनुभव नेई पुढें गांवगाडी !

साताऱ्याचें पोर मात्र हें घडतांना क्रांति
उघड दाखवी भूमिगताच्या कार्यावर प्रीति
दिला आसरा उरीं कितीदां मर्द जवानांना
भूमीवर या स्वैर हिंडले भूमीगत नाना

कितीदां शिजले बेत येथल्या बामणवाड्यांत
याच गांवचे नांव जाहलें अमर पवाड्यांत
प्रतिराज्याच्या प्रचारयंत्रीं भरूनिया आग
याच गांवचा शाहिर आणी मुडद्यांना जाग

नसो नाहिं तर या खेड्याला पाहिला इतिहास
सुपूत त्याचे उजळूं आम्ही नव्या भविष्यास !
फडकत राहो असाच येथें झेंडा तिनरंगा
नित्यच नांदो खेडें माझें धरून संतसंगा !

* * *

# माझा चष्मा

माझा चष्मा कांचेचा
नव्हेच हिरव्या पाचेचा

माळ दिसे मज भकास डोळा
उजाड दिसती डोंगरमाळा

ताप जाणवे दिवसाचा
माझा चष्मा कांचेचा.

पर्णहीन हीं अवघीं झाडें
मिटलेलीं अन् त्रस्त कवाडें

अशक्त बांधा वास्तूंचा
माझा चष्मा कांचेचा.

तगमग दिसते मानव्याची
झगमग खुपते दानव्याची

थाट उद्यांच्या मरणांचा
माझा चष्मा कांचेचा.

असें तेंच मज स्पष्ट दिसावें
भिंग भिजावें गळुन आंसवें

हाच भोग या नजरेचा
माझा चष्मा कांचेचा.

माझा चष्मा कांचेचा
नव्हेच हिरव्या पाचेचा

* * *

# अगतिक

कळयाफुलांचीं मुकलीं गाणीं
अशोक हिरवा दारीं वठला
माळवदावर जीर्ण हराळी
उन्हांत गुंतुन वारा तुटला

आळ्यावरच्या घरळ्याभंवतीं
फिरे मनाची गांधिलमाशी
पंजा चाटित पडला आहे
एक कवडसा दूर उपाशी

अबोल चिंता अंग पोखरी
कळतें कांहीं परी वळेना
नीरवतेंतुन शब्द उमटती
अर्थ त्यांतला शपथ कळेना

गोगलगाई सर्व चालल्या
पळापळाच्या किडक्या मुंग्या
त्या मुंग्यांनीं फस्तच केल्या
अहंपणाच्या गळल्या नांग्या

गतीच आहे सर्व थांबली
जाळें त्रिणतां काळच फसला
जाणवलें पण या डोळ्यांना
चित्रामधला अच्युत हंसला.

* * *

## नवकाव्य

" समता वर्तावी
अहंता खंडावी "
याच्यापुढें गेला आहे
कोण प्रज्ञावंत कवी ?

" जनीं जनार्दन
अखंड पूजीन "
याच्यापुढें गेलें आहे
कोणा कवीचें जीवन !

" भल्यासी लंगोटी
नाठाळासी काठी "
याच्यापुढें गेला आहे
कोण शाहीर मऱ्हाठी ?

कळस बांधोनी
ठेविला जुन्यांनीं
तळीं मंदिराचा पाया
आहे भरला रे कोणीं ?

जुनें पालुपद
जुना हा प्रसाद
जुने कोण, नवे कोण
हा तो फुकाचा विवाद !

माझिया मनाचा
भाव हा सदाचा
' म्हणो 'निया गेले त्यांच्या
होत्या अमृताच्या वाचा

म्हणिलें म्हणावें
जाणिलें जाणावें
इये देशिचिये क्षोणीं
काय नव्यानें सांगावें ?

* *

# Rummy

तीनहि एक्के सलग लागले
उरल्या पानीं पान जुळेना
राजे राण्या तळीं फेंकिल्या
तरी गुलामी फौज टळेना !

दोन दोन हे गुलाम जमले
हमरंगांची जोडी जोडी
तिसऱ्यासाठीं पान उचलतां
हातीं लागे दुरी तेवढी !

लाल सत्तिचे लपले जोकर
रिचातिल त्याविण गुलाम कोठें ?
फेकायासी नुरली संधी
काय करावें ? कोडें मोठें !

तीन्ही एक्के, गुलाम चारी
दश्शा, नव्या, चव्या, दुरीं
कुठें न कांहीं जुळे सांखळी
अपयश ठरलें हाय अखेरीं

' जोकरवांचुन जिंकूं आपण '
अहंकार हा पुरता गळला
हातांमधला घोळ सरेना
गोंधळांत या मेंदू चळला

येवो आतां जोकर म्हणुनी
पान उचलितां हलक्या हातें
चौकट राजा तोंड दाखवी
अखेर झाली, फिरलें माथें !

लाल सत्तिच्या जोकरवांचुन
डाव रमीचा रमे संप्रती
हांव सुटेना, आंस हटेना
मार्कांचे अन् पर्वत हातीं !

* * *

# नवा आनंद

बघवत नाहीं, बघवत नाहीं
. हाल भयंकर किती सतीचे !

मुके अवंढे गिळतां गिळतां
भेसुर झालें रूप रतीचें !

उसकटलेले केस चिवडुनी
पाय आपटी, हात हिसकितें

कां प्राणाचें दीन पांखरूं
दैवच देहांतुनी उसकितें ?

कान लावुनी बंद कवाडां
भिऊन बसलीं चिमणीं बाळें

मुकी बैसली अल्लड क्रीडा
ओले झाले इवले डोळे

शांतिपाठ अन् गात राहिला
ओटीवरती वेडा ब्राह्मण

पाचोळ्याशीं करितें कुजबुज
उदासवाणें मळलें अंगण

असहनतेला देत धिरावा
आंत वावरे प्रौढा दाई

बंद कवाडापाशीं कुजबुज
' मरेल कां रे आतां आई ? '

या प्रश्नाला रडवें उत्तर
एकच उठलें रडूं बोबडें

क्षणार्धांत कां कुणीं उघडलीं
तीं दुःखाचीं बंद कवाडें !

बंद दारही उघडें झालें
प्रौढ हांसरा साद उमटला

'पळा मुलांनो, पेढा आणा
नवा तुम्हांला भाऊ झाला !'

पावसांतुनी उन्हें नाचलीं
बोल अबोलावरती फुलले

कडुलिंबाचें निशाण रोंवुन
दार उघडलें पुनश्च मिटलें !

कडू तरीही शुभद लिंब तो
डुलूं लागला दारावरती

आणि घरांतिल आनंदाला
पुनः नव्यानें आली भरती !

* * *

## गोंधळ

फुटलें आहे पुरें तांबडें
तरी चालला आहे गोंधळ
‘ रामराज्य हें असें नांदलें...’
कथा पुराणी अद्‌भुत भोंगळ.

नमनीं सरली अर्धी रजनी
जळुनी गेलें तेल घडाभर
दिवळ्या करितो उपडा बुधला
दिवटीची अन् चाले फुरफुर

स्वरतालांचा मेळ जमेना
समेळवाला उभा पेंगतो
कुळरीतीचा कैफ नावरे
गोंधळिदादा कथा सांगतो

हवा तसा तो गातो आहे
हवा तसा अन् चाले अभिनय
प्रसन्न आहे रंगदेवता !
त्याचा त्याला नाहीं संशय

झोंपेवांचुन निजले श्रोते
भोळी श्रद्धा जागे नयनीं
ज्यांच्यासाठीं कुळाचार हा
ते तर दोघे रमले शयनीं

फुटलें आहे पुरें तांबडें
तरी चालला आहे गोंधळ
‘ रामराज्य हें असें नांदलें... ’
कथा पुराणी अद्‌भुत भोंगळ

* * *

# अफूचीं फुलें

स्वर्गधरेच्या सोपानावर
सचिंत बसले वीर हुतात्मे
मोठ्यानें ते विचार करती
अधिर ऐकती जिते मृतात्मे :

" स्वातंत्र्याचा बाग शिंपिला
चिरंजिवांनीं निजरक्तांनीं
हलकें हलकें रूप घेतलें
सतेज हिरव्या वृक्षलतांनीं.

वृक्षलतांवर फुलें होउनी
त्या बागेंतच आपण फुललों
सोसाट्याच्या वाऱ्यांनींही
स्थानांवरुनी नाहीं ढळलों,

पुष्पानंतर जन्म फलांचा
सत्य जेधवां आणि कळलें
अपसुख तेव्हां देह आपुले
फांद्यांवरुनी खालीं गळले.

रविकिरणांच्या विमानांतुनी
शाश्वत जागीं आपण आलों
मनें थांबलीं होतीं मागें
त्यांच्यासाठीं क्षणिक थांबलों.

क्षणाक्षणांनीं काळ वाढला
कवाड मिटलें वर स्वर्गाचें
धांपा टाकित आज पोंचले
खालुन वरती थवे मनांचे.

आणि मनांनीं सांगितलें कीं,
त्या बागेंतिल फळें विखारी
कितिक पांखरें स्वाद सेवितां
भुललीं, मेलीं दीन बिचारीं !

कशास केलें मग आत्मार्पण
कशास दानें व्यर्थ वपूंचीं ?
काय जन्मलों होतों आपण
भारतांत त्या फुलें अफूचीं ? ”

* * *

# इस्पितळ

दिवस फणफणे चढ्या ज्वरानें
रात जागते बसुन उशाशीं
अर्धांगीं तिज कोड पांढरें
निद्रानाशहि त्यांतच ग्रासी.

धनुर्वात हो विज्ञानाला
राक्षसबळ त्या अंगीं आलें
आवरितां त्या पडली नीती
दांत निखळले, कपाळ फुटलें.

अध्यात्माला लागे घरघर
सुतकी बसले त्याचे वारस
ठाउक आहे पण मरत्याला
एक त्यांतला नाहीं औरस.

इस्पितळांतिल काळ्या बाया
शुभ्र पांढऱ्या नेसुन साड्या
बेशुद्धांचे डाग चोरुनी
मनीं उभविती इमले माड्या.

रातपाळिचा वैद्य पेंगतो
खुर्चीमध्यें बसल्या ठायीं
मिटले त्याचे निर्भय डोळे
त्याचें त्याला माहित नाहीं.

खुर्चीपुढती एक तिपाई
शिसा मोकळा, उष्टा पेला
'आशा' अक्षर दिसे शिश्यावर
धन्वंतरि का मदिरा प्याला?

* * *

# निर्मल जीवन

या येथें मजला सात जन्म लाभावे
हें असें खगांनीं रोज पहांटे गावें
या द्वार नगरिचें शुक्रानें उघडावें
कोवळ्या उन्हांनीं आंत सकाळीं यावें !

पोसल्या गायिंनीं दूध सुधेचें द्यावें
धारेंत सखीचे कंकणनाद भरावे
फेंसाळ हांसणें पेल्यावर उसळावें
आकंठ पिउन तें जीवन मीं फुलवावें.

भर उन्हांत नांगर गीतासह चालावे
अन् मोटवणावर बैल चढा–उतरावे
पाटांत मुलींनीं कलश भरूनी न्यावे
अन् हिंदळतें जळ रानफुलांनीं प्यावें.

धारेंत मृगाच्या चिंब होउनी जावें
अन् तृप्त वावरीं बीज नवें पेरावें
कधिं मुसळधार जरि आभाळांतुन धांवे
त्या सेवेपासुन तिळही नाहिं ढळावें.

भरघोस पिकांतुन उभे मावचे व्हावे
गरगरा तयांवर गोरे हात फिरावे
पांखरांसवें मीं गोफणगुंडे खावे
घायाळ बावऱ्या नजरेसरशीं व्हावें.

कधिं उघड्या अंगीं नदी–जळीं डुंबावें
अन् घाटावरचे ओले रंग पहावे
कधिं चवऱ्यांमधुनी गुरांसंगतीं जावें
छायेंत प्रीतिचे दोन डाव खेळावे !

थंडींत आगटी पेटवुनी तापावें
अन् नरमगरमसे हुरडे भाजुन खावे
काधिं भल्या पहांटे उठून उगि हिंडावें
पायांस ओलसर जधीं हरभरा चावे !

वाऱ्यांत मुरलिचे मंजुळ नाद भरावे
त्या नादें ढवळे नंदी संथ चरावे
आडव्या डहाळ्या झोपाळे समजावे
अन् झोके आम्हीं तोडीनें चढवावे.

काधिं नजिक शहरच्या बाजाराला जावें
वाटेंत अचानक सौदे जुळुनी यावे
अन् रेंगाळत मग गमतीनें परतावें
गांवांत येइ तों कडुसें पार पडावें.

भरसुगींत मोती पोत्यानें उचलावे
बयत्यास दानही मुक्त करानें द्यावें
माघांत चांदणें चांदीचें सांडावें
लावण्या पवाडे फडांत ओसंडावे.

खांबास टेकुनी देवळांत रेलावें
देऊन कान कधिं संतकवी ऐकावे
तें मेलें जीवन शहरी नाहीं ठावें
या खेड्यामाजीं सर्वसुखें नांदावें !

हरदिवशीं आम्हीं कायीं दंग असावें
चांदण्यांत वा उन्हांत नित्य हंसावें
कां एकच ? असले सात जन्म लाभावे
हें निर्मळ जीवन पुन्हां पुन्हां भोगावें

★ ★ ★

# कृष्णाकांठीं

मनमुराद खेळुन मुलतानी मातींत
थकव्यास कोंडुनी श्वासासह छातींत
कुणि मल्ल बसावा प्राणायाम करीत
तें संध्याकालिन खेडें त्यासम शांत.

जलपृष्ठीं होतें तरळत बुडतें बिंब
त्या वांकुन बघती नदीकांठचे निंब
मळईतुन होतीं उतरत करडें चार
अन् एक शिळेवर धुणें चुबकती नार.

ती नार हालली लटकन् कां निमिषांत ?
कावळे उडाले कलकलुनी झाडांत
डोंगरामागल्या दरींत लपला देव
अन् सळसळले कडुनिंब भरुनियां हींव !

हा, हाय ! गांवच्या निष्पापी हृदयांत
शिरलेच इंग्रजी–साम्राज्याचे दूत !
काढुनी बार हे चार चावडीपाशीं
ते दरडावुनियां पुसती काय कुणाशीं ?

त्या पुसणारांवर डोळे रोखुन शांत
वांकला वृक्षसा, मधें उभा खेडूत
सांवळा चेहरा, वरी शिरांचें जाळें
तें शेतकऱ्याचें वृद्ध रूपडें भोळें !

जरबेंत तयाला पुसे कुणी अधिकारी,
"खेड्यांत कुठें या लपले सांग फरारी ?"
त्या मंद प्रकाशीं फुलले इंगळ दोन
चरकल्या संगिनी दृष्टी ती पाहून !

ग्रंथ संग्रहालय ठाणे

खेडूत वृद्ध तो हंसला मिष्किल शांत
बोलला परंतु किंचित् क्षीण स्वरांत,
" सरकार, दिसेना तुमच्या शत डोळ्यांना
तें कसें दिसावें आम्हां म्हाताऱ्यांना ! "

सणसणुन उडाली नळकांड्यांतुन गोळी
गगनास भेदुनी गेली आर्त अरोळी
लोळला क्षणीं तो वृद्ध गडी मातींत
ती बेडर छाती थबथबली रक्तांत !

सत्तांध म्हणे त्या शवास मारुन लाथ,
" होईल स्वच्छ तव दृष्टी, जा स्वर्गांत ! "
ते शब्द ऐकुनी लाल जाहली माती
घडविली तियेनें पुढें युगंधर क्रांति !

* * *

क्रांतींत पेटुनी उठे चिमुकला गांव
घातले तयानें साम्राज्यावर घाव !
तें कृष्णाकांठीं अजुन ' दुशेरें ' वसलें
अन् साम्राज्याचीं उडत चाललीं छकलें ! !

★ ★ ★

# श्रीगणेशाय नमः

पुराणांतल्या पुराणिकांनो
त्रिवार धन्या तुमची स्फूर्ति
आदिशक्तिच्या अंगमलाची
तुम्हीं घडविली मंगलमूर्ती !

सजीव केला मलिन गणपती
शिवरुद्राची दया शिंपुनी
द्विगुणित कोलित शक्ती त्याची
चार तयाचे हात कल्पुनी

त्यास निवडुनी सुरसेनानी
असुर बुडविले देवद्वेष्टे
खरेच तुम्ही कवी रवीसम—
स्वयंप्रकाशित त्रिकालद्रष्टे

किती युगांनीं आज उमगली
अमरकल्पना ही सत्याहुन
" निर्बल धर्मामधुनी जन्मे
निर्भयतेचें अजिंक्य आसन "

देशोदेशीं श्रमजीवीजन
आज घडविती गणेशमूर्ती
कान कापुनी घेवो नास्तिक
कानीं येईल त्यांची कीर्ति

सुरेश राजा असो सुरांचा
प्रथम गणेशा पूजिति निर्झर
यश देवांचें स्वर्गंगेसम
उगम गणेशच, गढूळ निर्झर

धर्मजात हें पाहिलें दैवत
धर्माहुनही जुनें जगाला
जुन्या कवींच्या कल्पकतेला
नव्या कवीचा मुजरा पाहिला.

* * *

# गृहसाम्राज्य

तुझी माझी राजधानी
सौख्यशांतीचें नगर,
माझा प्रकाश दाहक,
तुझी चंद्राची नजर.
तुझा माझा राजवाडा,
वर सोन्याचे मिनार,
माझें पाषाणाचें मन.
तुझी दानत उदार.
तुझा माझा रत्नकोष
भरे कुबेरभांडार,
माझे प्रखर हीरक,
तुझे पैलू हळुवार.
तुझी माझी गजशाला,
इंद्र हेवा करी वर.
माझा देह दाणगट,
तुझी चाल दमदार.
तुझी माझी फुलबाग
समाधानाचें उद्यान,
माझा स्वभाव ग्रीष्माचा,
तुझा श्रीमंत श्रावण.
तुझी माझी राजवट,
प्रजा नांदते सुखांत.
माझा अवखळ राग,
तुझे दयामय हात.
तुझें माझें सिंहासन,
प्रभा फांको सभोंवार
वर कीर्तीची कमान,
खालीं पुरुषार्थ चार.

* * *

# महात्म्या

ज्यांच्यासाठीं करिशी यात्रा
तेच परतले भिउन तमाला
नकोस परतूं तूंहि परंतू
चाल पुढें तूं चाल एकला !

क्षीण पदांच्या वज्रगतीनें
तोड भराभर लक्ष योजनें
धराब्रह्म तव धरील वक्षीं
रक्तमाखलीं वत्सलांच्छनें

अमृततारा शोधायास्तव
वारा काढी अनंत मंथुन
पर्जन्याचें उडे हलाहल
सर्वांगानें टाकच प्राशुन

देहयष्टिच्या थकल्या वेशीं
निज प्राणांचीं वेजें पाडुन
मनोगतांची मोहन मुरली
तुझी जाउं दे युगांस फोडुन

अंधारांतुन, पर्जन्यांतुन
भयभीतांना घालित हांका
नमवित शमवित वादळवारा
नेइ हृदयींची रत्नशलाका

सत्ययुगाचा यात्रेकरु तूं
कळलें नाहीं मानवतेला
कळेल त्याचें वळेल पाउल
चाल आज तूं चाल एकला !



२१०२५

# आम्ही महात्म्याचे चेले

आम्ही महात्म्याचे चेले
आम्ही पिढ्यांचे वैष्णव
आम्ही समतेचे भक्त
आम्ही शांतीचे पूजक

आण तुकोबा वाण्याची
आण भीमेच्या पाण्याची
आण ज्ञानोबारायाची
आण 'एका' ब्राह्मणाची

आण तुकोबा वाण्याची
नाठाळाशीं भेटी होतां
आण ज्ञानोबारायाची
जिंकूं ज्ञानानें पैठण

देऊं भल्याची लंगोटी
हाणूं माथ्यावरी काठी
वर्तूं अखंड समता
खंडूं मूढांची अहंता

आण 'एका' ब्राह्मणाची
बंड वेदांताचें मोडूं
आम्ही महात्म्याचे चेले
सीमा सुटतां शांतीच्या

घेऊं अंत्यजाचें पोर
शोधूं पुन्हां ज्ञानेश्वर
गुरुपदीं दृढभाव
ठोक सांगूं 'चले जाव !'

* * *

# नका थांबवूं इथेंच दिंडी

नका थांबवूं इथेंच दिंडी,
कलेवरावर वाहत बुक्का !
वैकुंठीं हा गेला वैष्णव,
भगवी मागें उरे पताका !

नका थांबवूं इथेंच दिंडी,
अनवाणी हें पूजित पाउल !
मर्त्य मूढ हा गौरव तुमचा,
मुक्ताला ना त्याची चाहुल !

नका थांबवूं इथेंच दिंडी,
या मरणाचें काढुन कारण !
युगतारा हा चमकुन गेला,
वाट एकदां अचूक दावुन !

नका थांबवूं इथेंच दिंडी,
सुतक कशाचें याचें धरतां !
याचसाठीं तो आला होता,
हेंच म्हणाला मरतां मरतां !

नका थांबवूं इथेंच दिंडी,
नका गमावूं वेळ आणखी
बुद्धवडाच्या तळीं पोंचवा,
खांद्यावरची जुनी पालखी !

नका थांबवूं इथेंच दिंडी,
यात्रा जमवा तीर्थस्थानीं !
अखिल जगांतिल वेडे जमवा
वडाखालती होतिल ज्ञानी !

नका थांबवूं इथेंच दिंडी,
डोक्यावरतीं उन्हें तापलीं !
कैक योजनें दूर येथुनी,
बुद्धवडाची थंड साउली !

नका थांबवूं इथेंच दिंडी,
तळें नव्हे तें दिसतें मृगजळ !
तुमची तुमच्या पदीं साउली,
करिल समोरिल वारा शीतळ !

नका थांबवूं इथेंच दिंडी,
पालखिसंगें अखंड जाणें !
या संताची करीं पताका,
या संताचें ओठीं गाणें !

नका थांबवूं इथेंच दिंडी,
या संतासम मार्गीं मरणें !
पिढ्यापिढ्यांचा प्रवास करुनी,
ठरल्या जागीं तुम्हांस जाणें !

नका थांबवूं इथेंच दिंडी,
या संताची उचला वीणा !
नसो नाहिं तर त्याची वाणी,
पुढें चालवा याचा बाणा !

* * *

# आसरा

अराजकांतिल भूमिगतांसम
दिसतां दिसतां लपल्या तारा

ढगाळलें नभ, तडित् कडाडे
धांवत घुसला तमांत वारा.

धडाडल्या वर काळ्या तोफा
आगरेघ ती उठली भीषण

साताऱ्यावर पडतां गोळे
झाल्या त्यांच्या गारा गोठुन.

गारांच्या त्या वर्षावांतुन
नभधरणीचा चुकवित मारा

सैतानांचें सावज होउन
पळे क्रांतिचा एक मोहरा.

वरुनी गारा, मागुनि मारा
पुढती अंधाराच्या भिंती

रणांगणांतिल विजयध्वजासम
पुढें धांवती ताठर छाती.

विज्ञानाची गुलाम बिजली
हुकुमासरशी वाट दाखवी

अनुरोधावर सुटल्या गोळ्या
लीलेनें तो नायक चुकवी.

दोन्हीपाठीं साठ पाउलें
तमास भेदी फितूर बिजली

सत्तांधांच्या जड डोळ्यांना
नरसिंहाची मूर्ति दिसली.

तडतड होत्या वर्षत गारा.
धुंद अरोळ्या त्यांत मिळाल्यॉ

मान वळवुनी सिंह पाहतां
तीरफेंकिवर संगिनि भिडल्या.

रानवटींतिल ओला रस्ता
कांटेफांजर जिकडे तिकडे

निसर्ग, मानव झाले कौरव
चक्रव्यूहिं तो वीर सांपडे.

"·पकडा, पकडा, वेढा घाला !"
घरभेदीपण हर्षुन बोले

तीस जणांच्या मार्गे टापा
पुढें धांवती दोन पाउलें.

देह वाहिला मातृभूमिला
मरणाची तर नव्हती भीती

वीराला पण गमलें लांच्छन
जिवंत जाणें अरिच्या हातीं.

पळतां पळतां मनांत फिरती
विचार भीषण भवितव्याचे

" सांपडतां मी यांच्या हातीं
ग्रामराज्य कां नष्ट व्हायचें ? "

पुन्हा अभाळीं झडली बिजली
झोत विजेचे रुतले मागुन

बधीर झाली बुद्धी, काया
आला आला शेवटचा क्षण.

तोंच समोरिल अंधारावर
क्षीण पाहिली प्रकाशरेखा

दार किलकिलें ओढत होती
झोपडींतुनी कुणी बालिका.

" थांब थांबरे पळत्या षंढा
ना तरि आली भिडली गोळी "

देशघातकी सैल जिभांची
पुन्हा जाहली उंच अरोळी.

आरोळीच्या आधीं भिडला
वीरगडी तो दारां जाउन

चकित होउनी तीहिं नवोढा
उघडी दारा, थोडी दचकुन.

" तुफान...सैनिक...शत्रू मागें... ! "
शब्द एवढे तिनें ऐकिले

कोपऱ्यांतली समई विझली
पळांत आणिक दार लागलें.

पुन्हा विजेचे झोत धांवले
झरत्या, ओल्या अंधारावर

चिंब होउनी निथळत होतें
गारांखालीं लवलें छप्पर.

मूढ शिपाई चकले, फसले
सुटुनी गेलें सहजीं सावज

हुलकावणिनें फसत पारधी
सिंह निसटला, मारुन दिग्गज.

गणवेषांच्या होत पखाली
गारा बसल्या थोबाडांवर

तशांत सुटलें सावज हातुन
तीस दांडगे झाले जर्जर.

परस्परांवर चिडले कोणी
कोणी चिडले स्वतांस्वतांवर

गोळ्यांनाही नाहीं तुटलें
तीरफेंकिचें काळें अंतर.

शेतवडींतुन, झुडुपांमधुनी
शोध घेतला घरभेद्यांनीं

भिजल्या गवती गंजीमाजी
व्यर्थ खुपसल्या कुणीं संगिनी.

आणि अखेरिस अधिकाऱ्यानें
दारावर त्या लाथ मारिली

खोकत खोकत झोंपडींतुनी
लवली वृद्धा समोर आली.

सुरकुतलेला गौर चेहरा
भाव त्यावरी प्रसन्न भोळे

झोत विजेचा पडतां त्यावरी
लुकलुकले ते सखोल डोळे.

दरडावुन, स्वर करडा काढुन
पुसे दांडगा मग अधिकारी

" लपविलास तूं काय थेरडे,
झोपडींत या कुणी फरारी ? "

" देवाशप्पत नाहीं दादा "
दोन कांपरे ओठ हालले

गलित देह तो बाजुस सारुन
झोत विजेचे आंतच घुसले.

" कोण दोन ते त्या खाटेवर ? "
पुसे शत्रुचा एक शिपाई

लाजुन, दबकुन सांगे वृद्धा
" दादा, माझीं लेक-जांवई ! "

तडतड गारा उडल्या बाहिर
खदखद हंसले सर्व शिपाई

चावट भाष्यें करुनी त्यावर
कुणी विजेनें पुनश्च पाही.

" हंसतां कसले ? शोधा त्याला ! "
अधिकाऱ्याची वाणी भकली

मिटले सारे झोत विजेचे
प्रत्येकाची चर्या पडली.

आले आणिक निवुनी गेले
पडत्या गारा घेत शिपाई

अनोळखी त्या बहिणीपाशीं
सुखरुप होता कुशींत भाई.

शांत जाहला पाउस आतां
गारांचीही सरली तडतड

दहशतवादी साम्राज्याची
दूर पोंचली दुबळी बडबड.

अंधारांतच खाटेवरुनी
क्रांतिवीर तो बाजुस होई

नवोढेस त्या म्हणे, " पुन्हा मी–
तुझ्याच पोटीं येइन आई ! "

नवोढेसही गहिंवर दाटे
शब्द फुटेना, नयनीं गंगा

–" कूस फाडुनी तुझ्यासारख्या
रणमर्दाला द्यावी जागा ! "

सखोल डोळे गळूं लागले
कुरवाळुनिया त्या दोघांना

अश्रूखालीं पुनश्च भिजवी,
वीराला ती वृद्ध अंगना !

बेचाळिसच्या बलवंतांना
असा लाभला दिव्य आसरा

लोकशक्तिच्या सामर्थ्यावर
चिरंजीव हो मग सातारा !

# नवल

“ नवल वर्तलें, नवल वर्तलें ! ”
अज्ञसुज्ञ जन म्हणूं लागले,

“ लाखपतीच्या हातावरती
सहज धनाचें झाड उगवलें ! ”

नवल नर्तलें, नवल वर्तलें
फळाफुलांनीं झाड लकडलें.

युद्धकाळचा येतां मोसम
पेढीमाजी ‘ फळ ’ सांठविलें.

नवल वर्तलें, नवल वर्तलें
लाखपती तो मोदें डोले

अंडिं घातलीं द्रव्यफळांनीं
स्थळ पेढीचें अपुरें झालें.

नवल वर्तलें, नवल वर्तलें
राष्ट्रधुरिण तें पाहों गेले.

नजरेसरशीं फुटलीं अंडीं
अलग जाहलीं सुवर्णशकलें.

नवल वर्तलें, नवल वर्तलें
कुबेर भ्याला, धुरीण थिजले

रक्त आणखी तप्ताश्रू हे
बलक पाहतां अंड्यांमधले

* * *

# मायाविनी

भर माध्यान्हीं आलिस,
दारीं तृषार्त होऊनी.
दयेनें मीं पाजविलें
माझ्या नयनींचें पाणी.

माझ्या सालस पापण्या.
तुझ्या भिडतांच ओठीं,
अशेष तूं मायाविनी,
माझी शोषिलीस दिठी.

आणि भरल्या संसारीं,
झालों क्षणांत आंधळा !
वर फुंकर घालुनी,
दाखविशी नाना कळा.

बरें झालें, बरें झालें,
माझे काढिलेस डोळे !
नको बघाया फिरून,
तुझे विषमय चाळे !

★ ★ ★

# भावकोमलता

भावकोमलता माझी
तिरस्कारुनी अत्यंत
तोडुनिया गाडशील
धरणीच्या उदरांत
गाडलेली कोमलता
लता होऊनी रुजेल
तुझ्या उजाड अंगणीं
सदा वसंत रिझेल !

भावकोमलता माझी
पर्थ्यांखालीं तुडवून
अथांग या सागरांत
टाकशील बुडवून
बुडलेली कोमलता
नौका होऊनी येईल
साऱ्या दुःखाच्या पैलाड
तुला घेऊनी जाईल !

भावकोमलता माझी
चुरगळूनी हातांत
रागें रागें फेकशील
धगधगत्या आगींत
आगींतून कोमलता
ज्योतिरूपें आकारेल
तुझ्या अंधेऱ्या जीवनीं
मंद प्रकाश फिरेल !

भावकोमलता माझी
पुरी येऊनी शिसारी
सैल हातें फेकशील
अंनत या वाऱ्यावरी
वाऱ्यावरी कोमलता
रूप पिकाचें घेईल
तुझ्या खिडकीशीं रोज
गाणें प्रसन्न गाईल !

भावकोमलता माझी
वेडी होऊनी रोषांत
कैक योजनें वेगानें
फेकशील आकाशांत
आकाशांत कोमलता
रूप घेईल मेघांचें
आणि तुझ्या अंगणांत
नृत्य श्रावण-रेघांचें !

भावकोमलता माझी
महाभूतांच्या अतीत
तिला नमवूं शकेल
एक मात्र तुझी प्रीत
तुझी प्रीत न लाभतां
कोमलता कणखर
तिला युगांचें आयुष्य
न्याहाळाया जन्मांतर !

* * *

# राज्याभिषेक

डोळ्यांतले भालदार
देती मुकी ललकारी,
भुंवईच्या कमानींत
आली सम्राज्ञीची स्वारी.

तातडीनें खुला केला
माझ्या मनाचा महाल,
तुझ्या प्रमत्त प्रीतीला
आंत येऊं दे खुशाल!

दोघांतल्या अंतरांत
अंथरला दृष्टिक्षेप
दिव्य विजेच्या वेगानें
तिचा होवो पदक्षेप!

आर्जवानें पुढें आल्या
माझ्या नाजुक भावना,
देति मानाचे मुजरे
भावी सुखाच्या कल्पना!

एका पळांत पटली
दोन जिवांची ओळख,
कसा कुठून जाहला
अमृताचा अभिषेक!

गडे, माझ्या प्रणयाची
तुझी प्रीति महाराणी,
आतां भोगोत साम्राज्य
हृदयाच्या सिंहासनीं!

* * *

# मृग

माउलीच्या दुग्धापरी
आले मृगाचे तुषार,
भुकेजल्या तान्ह्यासम
तोंड पसरी शिवार.

तुकोबाच्या अभंगाला
मंद चिपळ्यांची साथ,
भरारतो रानवारा
तसा झाडाझुडपांत !

पिऊनिया रानवारा
खोंड धांवे वारेमाप,
येतां मातीचा सुगंध
स्तब्ध झाले आपोआप,

अवखळ बाळांपरी
पक्षी खेळती मातींत,
उभारल्या पंखावरी
थेंब टपोरे झेलीत !

धारा वर्षतां वरून
बैल वशिंड हालवी
अवेळींच फुटे पान्हा
गाय वत्साला बोलवी !

गांवानेंच उंच केला—
हात दैवी प्रसादास,
भिजुनिया चिंब झाला
गांवदेवीचा कळस.

निसर्गानें दिलें धन-
-द्यावें दुसऱ्यां, जाणुनी,
झालीं छप्परें उदार
आल्या पागोळ्या अंगणीं !

काळ्यामाळ्या करितात
बाळें उघडीं नागडीं,
सांचलेल्या पाण्यामधीं
नाचतात घडीघडीं !

नांगरली रानवट
आतां फुलेल रोपांनीं
पान लागे चवदार
शेतकऱ्यांना चिंतनीं !

स्नान झालें धरणीचें
पडे सोन्याचा प्रकाश !
आतां बसेल माऊली
अन्नब्रह्माच्या पूजेस !

* * *

# अतिवृष्टि

आलें झांकळून नभ ओते सारखा पाऊस,
क्षण नाहीं उघडीप आभाळाच्या आक्रोशास !
मुळांतून उखडतीं झाडें जुनाट रस्त्याचीं,
चिखलांत माखे त्यांची सेवा अनंत काळाची !

लाख पावलांच्या खुणा नेल्या जळानें वाहून,
मार्ग निरुंद खेड्याचे गेले भयाण होऊन !
जलौघाच्या ताकदीनें पातीं तुटलीं तृणाचीं,
नाल्यांतून वाहे जणूं प्रेतयात्रा ही तयांची !

नाहीं कुठें कलरव नाहीं वारें माणसाचें,
नरिव या दिवसानें साग घेतलें मुक्याचें !
सूर्य नाहीं, चंद्र नाहीं नाहीं आभाळीं तारका,
खालींवर डोळां दिसे जलवर्षाव सारखा !

दूर पहाडांवरून कोसळतात प्रपात,
ताजें रुधिर वाहतें नग झेली वज्राघात !
जिथें तिथें पाणी पाणी सांचलेलें वा वाहतें,
कुठें तरी रस्त्यावर भिंत खालीं कोसळते !

बंद अवघीं कवाडें वारा धडक्या मारतो,
बेसुमार ओरडून आंत निवारा मागतो !
माती पाषाणांच्या आड जरी चाले व्यवहार,
वरुणाचा कोपानल कधीं नाहींसा होणार !

आली फुगून सरिता लांब उन्मत्त जहाली,
एका घोटांत घेईल सारा गांव घशाखालीं !
आणि कधींतरी पुन्हा बाळ गुराखी येथले,
बोलतील आपसांत " इथें गोकुळ बुडालें ! "

* * *

# ओसाड रानांत

ओसाड रानांत शमीच्या डोलींत
वीराची अर्धांगी जाहली प्रसूत
चिमणीं पांखरें, तापलेले वारे
याविना कुणी ना सोयरे धायरे !

माध्यान्हीं भास्कर भूतळ न्याहाळी
बघाया तेजाची प्रतिमा कोंवळी
जन्मत्या जीवाचें पहिलें रुदन
डोलीच्या बाहेर आलें तों दबून

विस्तीर्ण शमीच्या डहाळ्या डोलल्या
सानंद साळुंक्या मंजूळ बोलल्या
'फांद्यांचा पाळणा परांनीं मढवूं
विनीता-सुताला गाऊन झोपवूं !'

दूर मृगजळ झालें उतावीळ
लाडक्या बाळाला घालाया आंघोळ
तोंच हंबरली बाळाची माऊली
तान्ह्याच्या शरीरीं मृत्यूची साऊली !

कोवळें बालक दाढेनें फोडीत
निघाला कृतान्त निखारा ओकीत
गिळितां काळानें जन्मलें अर्भक
आईच्या जन्माचें जाहलें सार्थक !

वृक्षांना, शिळांना खगांना, नगांना
आपुली कहाणी सांगे ती अंगना
वेडाची लहर स्मृतींना बहर
चालला लोचनीं अश्रूंचा पाझर

६ ]

" क्रांतीच्या रथाचा सारथी धैर्याचा
अहेवपणाचा टिळक भाळींचा
आजन्म बंदींत कोंडिला शत्रूनें
उठला कल्लोळ आटलीं लोचनें !

सिंहाचा शावक घेऊन पोटांत
शत्रूच्या भीतीनें धांवलें वनांत
ओसाड रानांत शमीच्या छायेंत
बांधले किती मीं मनोरे मनांत

म्हणावें मनानें स्वतःही लढावें
क्रांतीच्या लढ्यांत लढूनी मरावें !
विरोधुनी मना बोलली भावना
पोटींच्या गोळ्याला वाहसी मरणा ?

कुशीचा कुमार करील संहार
शत्रूच्या रक्ताचा निर्मील सागर
आपुल्या पित्याचीं शौर्याचीं, धैर्याचीं
ऐकिलींत त्यानें सूत्रेंही लढ्याचीं

हाय हाय देवा, हाय हाय दैवा
जन्मतांच गेला मातींत तो ठेवा
देव कुणा म्हणूं ? दैत्य कुणा म्हणूं ?
माझ्या मांडीवरी मेला अभिमन्यू ! "

* * *

# फूल नाहीं, फुलांची पाकळी !

रूपगर्विते, तुला वानिती पाइक प्रीतीचे
म्हणती, " गालीं तुझ्या उमललें फूल गुलाबाचें ! "

त्याच फुलाच्या मुक्त पाकळ्या कुंदकळ्यांभंवतीं
मधुस्मिताची पखरण करुनी रसिकां मोहविती.

' नाहीं ' म्हणसी, नकोच देऊं चुंबन गालाचें,
देशिल ना पण तेंच याचका हंसऱ्या ओठांचें ?

फूल ना तरी नसो, मानितों सौख्य पाकळींत !
' फूल ना तरी द्यावि पाकळी ! ' जाणिसि ना रीत ?

* * *

# शपथ !

श्रावणांतल्या त्या रातीचीं शपथ घालितें तुला
नकोस टाकुन जाउं जिवलगा अशी एकटी मला

अर्ध्या रातीं रंगत होतीं गाणीं गांवांतलीं
फेर धरुनिया नाचत होत्या बारा घरच्या मुली

बंद कवाडाआड, तुझ्या मीं उरीं माथा टेकिला
श्रावणांतल्या त्या रातीची शपथ घालितें तुला !

त्या रातीची ऊब लोंकरी, ओलावा चंदनी
खिडकीमधुनी बघूं लागली न्हालेली चांदणी

बोल लावुनी तिला झणीं मीं सरपडदा ओढिला
श्रावणांतल्या त्या रातीची शपथ घालितें तुला !

दमट चांदणें पुसट उमटलें होतें पडद्यावरी
हळुंच टेकिले ओठ सख्या तूं, बुरखा मी सांवरी

चुरा ढगांचा फेंकुन वारा बाहेरी हांसला
श्रावणांतल्या त्या रातीची शपथ घालितें तुला !

झिम्मा फुगडी खेळुं लागला वारा धारांसवें
दबला माझा श्वास, मोकळीं तृप्तीचीं आंसवें

अदेय त्याचा दिला लाडक्या नजराणा मीं तुला
श्रावणांतल्या त्या रातीची शपथ घालितें तुला !

सरला श्रावण हिरवी गादी चालवितो भादवा
कितिही लुटला तरी वाटतो लाभ तुझा मज नवा

नको पेटवूं विरहानें हा सौख्याचा बंगला
श्रावणांतल्या त्या रातीची शपथ घालितें तुला !

* * *

# तुझं गुपित

मैतरणी गं सांग साजणी गुपीत समदं मला
कशाचा ध्यास तुला लागला ?

झुंजुरकाचं कावंवरती घेउनिया घागर
एकली जातिस ओढ्यावर !

गुरं वासरं पार पिटाळुन वरल्या माळाकडं
झटकशी उन्हांत कोणाकडं ?

शिरवाळीचं ओघळींतल्या निवत्या वाळूवर
बांधिशी कुणासंगती घर ?

कां घुटमळशी ग कडुसं पडल्यावर ?
कां अल्याड चुकती रानिं तुझीं वासरं ?
ती रोजच घुमते शीळ कुणाची बरं ?

करंजाखालीं कोण भेटतो शमलेवाला तुला ?
कशाचा ध्यास तुला लागला ?

पिंपरणीचीं कवळीं पानं उन्हांत व्हावीं तशी
कशानं मलूल झालिस अशी ?

गालांवरती रसरस करती मुरमाच्या पुटकुळ्या
चुरडल्या ओठांच्या पाकळ्या

कशी विरलि ग नवीन चोळी बाई छातीवर
पिचकले हातांतिल बिलवर ?

घे उरकुन आतां लौकर साखरपुडा
ह्यो खुळ्या पिरतीचा रस्ता लइ वांकडा
ह्यो लागो परता बोल तुला वावडा

पिकल्या आंब्यावरचा राघू चकवुन जाइल तुला
द्वाड ह्यो इष्काचा मामला !

* * *

२९०२६ दि. ३।०५ नों. दि. २९।१२।५५

# शापच कीं वरदान ?

९३८२

सौख्यांत कळा लागतात हा शापच कीं वरदान ?

पूर्व दिशेला दिसतां दिनकर
विश्व जोडितें त्यास उभय कर
लोचनांस पण दिसतें माझ्या कोसळतें दिनमान

चंद्रकरांनीं फुलली धरणी
भरे शांतता वातावरणीं
विरहव्यथेचें रुदन ऐकती अवचित माझे कान

शांत जलावर नौका झुलवित
तरुण चालला वल्हीं मारित
मनांत माझ्या भीषण वादळ घालितसे थैमान

दौलत रचुनी तिवड्याभंवतीं
कृषिक सुखानें गाणीं गाती
अवर्षणाचा आसुड घेतो ओढुन माझें भान

संमार्जित या भव्य अंगणीं
मुली खेळती छप्पापाणी
भविष्यांतलें दास्य तयांचें दुखवी माझे प्राण

रुमझुम रुमझुम वाजे पैंजण
तालावरती फिरतें नर्तन
भिववतो मला समाजांतला कंचनिचा अवमान

देशासाठीं फकीर झाला
वंद्य पुढारी मला भेटला
दिसतीं मातापितरें त्याचीं अन्नास्तव हैराण

यंत्रयुगानें विश्व जिंकलें
मानव आतां समर्थ झाले
आत्मघात हे करतिल अंतीं याची मजला जाण

समतावादी विजयी झाले
रणांगणावर शिंग वाजलें
'हुकुमशहा हे उद्यांच होतील' म्हणतें माझें ज्ञान

भविष्यज्ञ का असली वृत्ती ?
पापशंकि वा मनःप्रवृत्ती
सुखदुःखांतहि होइल का यानें शांतिनिधान ?

* * *

# अखेरची सलामी

रानवट गवतानें दिला अखेर आसरा
वारा छातीवर झेली दुष्ट बंदुकींचा वारा.

अंधाराच्या आडोशाला गवताच्या गारव्यांत
दबा धरूनी बसलों श्वास प्रयत्नें रोधीत.

तुकड्याच्या चाकराच्या होत्या आरोळ्या घुमत
फिरे यमाची नजर चोरकंदिलाचा झोत.

अचानक आला छापा सारे धांवलों सैराट
आणि तुम्ही सेनापति कशी चुकलांत वाट !

बाभळीच्या झुडुपाला असे कसे अडकलां ?
घरभेद्यांच्या दृष्टीला असे कसे हो पडलां ?

झोत, ओरडा, निराशा, गोळी हवेंत घुसली
आणि हाय रे दुर्दैवा किंकाळीच कानीं आली.

आवरलें आम्हांलागीं उरलेल्या कर्तव्यांनीं
खुनालागीं खून आम्ही दिला असता तत्क्षणीं !

बाभळीच्या झुडुपानें वैर कधींचें साधलें ?.
संगिनीचें गोल कडें प्रेताभोंवतीं जमलें !

पेट घेतली डोळ्यांनीं नसानसांतून ऊर्मी !
बसलेल्या जागीं आम्हीं दिली अबोल सलामी !

नाहीं आम्हीं खांदा दिला शेवटच्या पालखीला
नाहीं शास्त्रोक्त मंत्राग्नी नाहीं दानधर्म केला !

नाहीं वाहिला गुलाल नाहीं घातलें पांढरें
नाहीं अर्पियलें तुम्हां सुगंधित हार तुरे !

स्वराज्याचा सेनापति शिष्य आम्ही जातिवंत
प्राणपणें लढा लढूं होऊं स्मारकें जिवंत !

* * *

## वसंतराणी

काळ्या रातीं, वटवृक्षावर
हिरवी माया, पिवळे आसूं
गारठलेल्या दळभारावर
हवा लागली कानस घांसूं

काळ्या रातीं, वटवृक्षावर
लपे कोटरीं एक कावळी
अंधाराची ऊब भयानक
ठायीं फुगला, देह काजळी

काळ्या रातीं, वटवृक्षावर
चुकुनी तिजला थंडी वाजे
पंखांखालीं करिती चुळबुळ
कर्कशतेचीं ढवळीं बीजें.

काळ्या रातीं, वटवृक्षावर
फांद्या फांद्यालागीं म्हणती–
“ उद्यांपासुनी नव कोलाहल
कर्कशतेला आणिक भरती ! ”

काळ्या रातीं, वटवृक्षावर
अशी उद्यांची दडते चिंता
‘ भयाण तिथल्या शांत रसावर
तवंग कडवट उद्यां वाढतां ! ’

कुणी सांगणें त्या फांद्यांना
कावळिच्या त्या पंखांखालीं
जन्म न घेती काकच केवळ
नव्या ऋतूची तान सुरेली !

काकवंश तो करुनी माध्यम
समरंगाचा भंग टाळुनी
जन्मा येते आहे कोकिळ–
स्वरसम्राज्ञी, वसंतराणी !

* * *

# टाहो

झुलतो आहे मंद पाळणा
हलतो आहे जीव चिमुकला
किंचित् गुंगी खुपते नयनीं
तूंच देउनी गेलिस झोला

टाळूवरती फुंकर घाली
त्या झोल्यांतिल लोभस वारा
दिसतां दिसतां पुसुनी जाती
चांदव्यांतल्या टिकल्या तारा

मधें दचकवी एक हादरा
ओरडते अन् अजाण संज्ञा
शब्द-हीनता गळा दाटवी
काय करूं तें कळे न अज्ञां

हांक मारितां तुला माउली
कंठीं फुटतो केवळ टाहो
दुरुन ऐकतो साद तुझा मी
‘ त्या रडत्याला कोणी घ्या हो ’

नको स्पर्श मज कुणा दुजाचा
नको खेळणें, नको चोखणें
नकोत निर्जिव लुळ्या बाहुल्या
नको कुणाचे पापे घेणें

शेवंतीच्या त्यांच्या मांड्या
घुसती त्यांचे रोम शरीरीं
खोट्या कोमलतेनें त्यांच्या
मळती माझे गाल शेंदरी

हात चिमुकले, पांव चिमुकले
झाडित राहिन त्यांच्यावरती
पळूं न शकती पाय पांगळे
डोळे पण हे तुला शोधिती

तुझ्याच मांडीवरती निजुनी
तुझ्याच निळसर पदराखालीं
तुझ्या उरांतिल अमृत आई
तूंच माझिया ओठीं घाली

शब्द-हीन हा हट्ट मनाचा
तुझ्यावांचुनी कुणा कळेना
आक्रोशाची अखेर झाली
पाउल माई, तुझें वळेना !

* * *

# दरडीवर

डुइवर घागर, हातीं कळशी, अजब तुझा ग थाट
डोळं लववुन चाल जराशी, उभी चढणिची वाट

शेवाळानं झालं निसरडं, संभाळ् कलता तोल
उभी राहुनी माझ्यासंगं चार अक्षरं बोल
लया दिसांनीं आज गवसली एकांतींची गांठ !

मुरकी मारून गिरकीसरशीं असं काय जावं ?
बरा थडकला खडक पाउलां, ठोकरलं जोडवं
पदर घसरतां, मनांत भरला तुझा मराठी घाट !

दमांत जाऊं नको ठेचळुन कणखर माझं मन
बहिरि ससाण्यापरी झडपुनी नेइन ग उचलुन
पुरं पांखरा खुळी करामत, थांबच बिनबोभाट !

कुळवंताची बाळ सये तूं, मी मोठ्याचा पोर
खोडीसाठीं माझ्या पडतिल उगा इरेला थोर
डोळ्यांनीं तरि सांग ' आंतलं ' नकोस फिरवूं पाठ !

आडमुठ्याला आतां कळला लाजेचा हा खेळ
' चला ' म्हणालिस, आज उगमला दोन मनांचा मेळ

आतां भेटी वैशाखांतच सरतां आंतपाट
डोळं लववुन चाल जराशी उभी चढाची वाट !

* * *

# मोक्षाची वाट

शैव कशाचे ? वैष्णव कसले ? कसले वेदान्ती ?
योगी कसले ? हठयोगी तर केवळ मूढमती !

द्वैत कशाचें ? अद्वैताचें फोलच मतदान
जैन कशाचे ? बुद्ध कोठचे ? कसलें निर्वाण ?

भागवतांनीं व्यर्थ बांधिला नामाचा घाट
भवसिंधूंतुनि कुणा न गवसे मोक्षाची वाट.

आस्तिक-नास्तिक सारे धोंडे एका भिंतीचे
वादविवादीं व्यर्थ खेळती तांडव वाणीचें.

पाउलवाटा अडविति घालुन ज्ञानाच्या भिंती
जो तो म्हणतो, " भिंतीमागें देवाची वसती. "

पाखंड्यांचें पटुत्व आणि ज्ञात्यांचें वेड !
व्यर्थ वाढते नसत्यासाठीं असत्यांची तेढ !

सुखी जिवांची जिथें नांदते तीच एक पेठ
देव असो वा नसो, दाविते मोक्षाची वाट.

* * *

## रानांतली अंगाई

झोपडीच्या झापाम्होरं,
कसं चांदणं टिप्पूर

वाऱ्यासंगं हेलावतो,
उभ्या चिंचेचा मोहोर

सभोंवार काळं रान,
गेलं दुधांत भिजून

रानवेलींचीं लेकरं,
त्यास चाटती निजून.

उघड्या गव्हाणीशीं
बैल करीती रवंथ

करी रानाची राखण,
मोत्या जागत, पेंगत.

बाळा, दमून भागून
तुझं वडील झोपलं

नको किरकीर
झोंप उगीच मोडल.

* * *

## असंतोष

गिरि सिंहगडावर घेउन अल्प विसावा ।
नरसिंह परतती पटळक अपुल्या गांवा ॥

मस्तकीं अजुनही होतें भूत स्वराज्य ।
शिवभूप, तयांचें धर्माधिष्ठित राज्य ॥

तो कोंढाण्याचा लढा, त्यांतले वीर ।
ती तान्हाजीची तडितप्रभा तलवार ॥

तो हात विदेही, तुटुन संगरीं गेला ।
अन् ढाल होउनी लढला भगवा शेला ॥

परपुष्ट बाडग्या राजपुताचा वार ।
ते वीर कलेवर, जिवंत शोणितधार ॥

ती शेलारांची वृद्धयुव्याची मूर्ति ।
अन् सूर्याजीची समरगर्जना स्फूर्ति ॥

" हा बाप मरोनिया पडे रणांगणिं तुमचा ।
मग लोभ कशाला तुम्हांस तुमच्या तनुचा ? "

गाजला हराचा विजय कोंदला घोष ।
घुसलेच मराठे, रणीं पुरे बेहोष ॥

बेहोष तयांची चाल घेउनी पायीं ।
बळवंत पोंचले टिळक आपुल्या गेहीं ॥

आणिं निकटवर्ति जन दबकत पुढती आले ।
उग्रता मुखावर पाहुन मागें सरले ॥

उघडिलें कुणिं तरी तोंड सांगण्याकारितां ।
कधिं कार्नि न यावी अशीच होती वार्ता ॥

प्रश्नार्थ स्वारिची भुंवई किंचित् चढली ।
अन् आप्त मुखांतुन निसरुनि वार्ता पडली ॥

तडिपार जाहले लालाजी कीं हाय ।
बोलतां शब्द ती वाचा कंपित होय ॥

अन् वीर केसरी टिळकहि झाले स्तब्ध ।
लोचनीं परंतु वैश्वानर हो क्षुब्ध ॥

नयनांत शतघ्नी क्षणीं पेटल्या दोन ।
- अन् स्फोटक फुटला वायू श्वासामधुन ॥

हिसकली तयांनीं पगडी माथ्यावरची ।
तटतटे फुगुनिया रेखा भाळावरची ॥

सोडितां सुटेना बंद बंडिचा घट्ट ।
संताप दाटला छाती फुगली तट्ट ॥

तोडिले तटातट बंद, वरी निश्वास ।
ओठांत उडी घे मनांत दबली आस ॥

" कां हद्दपार हो देशभक्त तो थोर..." ।
अन् मधें पळालीं पळें भयानें चार ॥

उमटला मुखांतुन स्वगतचि प्रश्न ज्वलंत ।
" नांदतो कसा मग मिंटो अजुन जिवंत ॥ "

मग पुन्हा स्तब्धता तशीच कांहीं काळ ।
बसविला विवेकें काळस्थळाचा मेळ ॥

मुखिं शब्द उमटले अस्फुटसे चुटपुटते ।
" या दुर्बळ देशीं, कसें अपेक्षूं भलतें " ॥

* * *

७ ]

## शांतिसूक्त

पती विरागी ऋषी महात्मा :
कन्या त्याची त्रिभुवनसुंदर—
तिच्याचसाठीं शस्त्र उचलिलें
कुणीं क्षत्रियें तिच्या पित्यावर.

मोक्षगामि तो ऋषी महात्मा
बोलुं न शकला शब्द शेवटीं;
कुंवार राहे मार्गे कन्या
आश्रमांगणीं खुजी रोपटी.

धवलांगी ती तापसकन्या
मदनव्यथेनें झाली पीडित.
पती न लाभे त्रिखंड धुंडुन
जो तो पाही होउन शंकित.

यमधर्मांच्या यमीसारखी
ती भावाची करी विनवणी—
क्षीण क्षणाचा मुहूर्त साधुन
सहोदराची झाली राणी.

तृषार्ततेची तृषा सरेना;
थिटें पतीचें पडलें पौरुष.
देशोदेशीं फिरत वरी ती
व्यभिचाराचें वाण अमानुष.

आवाहन तुज देवि शांतते,
व्यभिचाऱ्यांची तूं सम्राज्ञी !
हविर्भाग हा तुला ठेविला;
अजापुत्र किति जळले यज्ञीं.

अधिकाराचा सोमकुंभ हा
तुझ्या पतीच्या दुबळ्या हातीं :
प्राशन करिं तो, येइं मंडपीं
यज्ञ मांडिला नव्या भारतीं !

* * *

# पुरुषसूक्त

वेदांमधल्या ऋचा थांबल्या
काळ धांवला पुढें युगांनीं
स्वेदामधल्या ऋचा नव्या या
यंत्रयुगेऽस्मिन्नवसूक्तानि !

सहस्रशीर्षा, समाजपुरुषा,
तुझा तूंच गा जागृत होई
तुझ्या प्रकोपें यज्ञ चेतवी
तुझा तूंच घे हविर्भागही !

अग्नितत्त्व तूं शुभ प्रलयंकर
सृजनशील तूं, तूं शिवशंकर
विश्व तोच तूं, तूं विश्वंभर
कराल तो तूं, तूं गंगाधर !

तुझ्या कृपेचे जे भस्मासुर
सिद्ध जाहले तुज जाळाया
तूंच निर्मुनी नवी मोहिनी
जाळ तयांच्या कृतांत काया !

तुझ्या प्रियेच्या लाभासाठीं
द्वंद्व खेळती आसुर दोघे
परस्परांचे प्राण प्राशुनी
त्यांस परतवी त्यांच्या मार्गें !

तुझ्या दयेनें दैत्य मातले
तुझ्याच छळिती प्रल्हादांना
फोड नृसिंहा, फोड स्तंभ तूं
करित भयंकर सिंहगर्जना

दैवी तेंवी क्रूर पाशवी
तुझ्या अंगच्या दोन्ही शक्ति

घाल पशूचा क्रुद्ध मुखवटा
त्यांस द्यावया सदेह मुक्ति !

नको तभीं वा नको प्रकाशीं
जुन्या-नव्याच्या संध्याकालीं
फाड उदर तें उंबरठ्यावर
ओढ आंतल्या कुजक्या साली !

सहस्रशीर्षा, सहस्रपादा
तूंच वार या तुझ्या आपदा
उपभोगाया आण पदार्थी
तूंच निर्मिली तुझी संपदा

तूंच सांग रे वेद ऋषींना
विचारधारा काव्यकथांना
चक्र सुदर्शन घेउन हातीं
गीता पाजिव मूढ अर्जुना

—आणिक अंतीं सहस्रनेत्रा
नयनांतुन तूं निर्मी शक्ति
चामुंडेंतुन नटव अन्नदा
शांतिः शांतिः शांतिः शांतिः

* * *

# परिस्फोट

गीत हवें का गीत ?
एका मोलें विकतों घ्या रे विरह आणखी प्रीत

गिऱ्हाइकाच्या लहरीखातर
कांतुनि मीं आणियलें ' अक्षर '
सुरेख केल्या बघा बाहुल्या वरी बांधिली फीत

नीटस गोंडस, वजनीं हलक्या
मुक्या तरीहि दिसाति बोलक्या
नयनीं यांच्या भाव कोरिले जे सर्वां माहीत

हंसऱ्या, रडव्या, सुस, खेळत्या
कळसूत्रीं कुणि सहज नाचत्या
भडक घातले वेष, सहज जे करिती जन मोहीत

कोण हंसे तें दबल्या ओठीं !
सौदा करितों पोटासाठीं
रस्तोरस्तीं फिरुनि पोटच्या कन्या नाहिं विकीत !

हंसणारांनो, वेळ काढुनी
या गरिबांच्या प्रसन्न सदनीं
अरुणरम्य त्या बघाल लेकी, बघाल त्यांची रीत

उरांत माझ्या अग्नी लपला
पोटीं आल्या समूर्त चपला
असेल साहस तर या गेहीं, होउं नका विचलीत

दिसतो तुम्हां तो मी नाहीं
कसले येतां माझ्या गहीं
उन्मेषाच्या वनीं नांदतों, तेजाच्या जाळींत

तेथें येतिल ते तर ज्ञानी
तसें म्हणावें तुम्हांस कोणी ?
फिरते छाया पथांत माझी, तीच बसा न्याहळीत

मी ' हंसण्यानें ' तुमच्या ' हंसलों '
बोलुं नये तें गूज बोललों
तुमच्या दारीं रोजच बसणें माल मला खपवीत

* * *

# द्राक्षवेल

अश्वत्थाचे सुकलेले हात
आले आहेत खिडकींतून आंत
त्या हातांच्या शिरा सुरकुतल्या आहेत
हथेल्या पालथ्या आहेत.

हे आले आहेत कशासाठीं ?
आशीर्वादासाठीं कीं निमंत्रणासाठीं ?

बाहेर रखरखती दुपार,
आकाश नागवें निळें शार,
कलाकाराच्या पानासारखी—
त्यावर एकच एक स्थिर घार.

दृष्टीच्या टप्प्यांत आहे एक दार,
त्यांत हलत्या आकृति तीन चार,
वर्कशॉप दिसतें आहे कसलें तरी.

फिरताहेत चाकें,
त्या चाकांशीं चौकसपणा वांके,
इकडे एक मोडकी मोटरकार.
तिकडे एक निजलेलें कुत्रें,
रचलेले चकचकीत पत्रे,
वायरची थंडगार गुंडाळी,
सांडपाण्याच्या अमर्याद पन्हाळी.

नागवें आभाळ...

धडपडणारें धरातळ—
या दोन्हींना न्याहळणारे माझे डोळे...
त्यांची चाल पुन्हां पुन्हां अडखळे...
...दूरच्या कोपऱ्यावर...
एकदां, दोनदां,
अनेकदां !
तेथें पाषाणावर चढते आहे
एक द्राक्षवेल पोरसवदा.

* * *

# मूर्तिभंग

"अंधारावर प्रकाशानें लिहावें;
तें अक्षर व्हावें —"
— यासाठीं दौड होती त्याची.

त्याचा वारु अनावर होता
बेलगाम होता.
त्यानें तुझ्याकडे याचना केली—
लगामाची —
गच्च लगामाची !

तूं लगाम असा आवळलास——
कीं घोडदौड थांबली,
तंग तुटला ;
स्वार कोसळला !
निष्प्राण झाला !

काळ्यावर पांढरें जरा चमकलें.
— पण त्या चमकण्यानें
अंधाराचें अस्तित्व आणखी भीषण केलें

आजवर —
अशा अश्वारूढ मूर्ति—
आम्हीं पूजेसाठीं निवडल्या
त्या तूंच...तूंच फोडल्या

तूं मूर्तिभंजक आहेस
मूर्तिभंजक आहेस
मूर्तिभंजक !

* * *

## मोक्षगर्भा

त्या रातीं तुम्ही आलां हृदयेश्वर !
मी काढुं न धजलें ओठांतुन अक्षर
पाहिली जयाची वाट चातकाहुन
पाहिलें त्यांस ना भुंवई उंचावुन

काजळे निरांजन तव प्रभा पाहुन
ताटींच राहिलीं सुमनें कोमेजुन
थरथरे धुमाची रेघ, जळे चंदन...
त्या रेघेसम मी शहारलें लाजुन !

दिधलेंत आलिंगन दबल्या शय्येवर
केलीत माझिया कांतीची चादर
क्षण निर्दय करुनी वरद सांवळे कर
मर्दिला नाथ ! या उरीं नांदता स्मर

उसळला सभोतीं तेजाचा सागर
कोसळे तशांतच ताऱ्यांसह अंबर
दडपली तनू ही, गुदमरलें अंतर
अन् कुठें बुडालें...जळलें मी नंतर ?

मज आज कळालें, दान मिळालें दान
मी पडलें तेव्हां चढलें सुरसोपान
होतसे उरोजीं अमृतरस निर्माण
अन् मूर्त वाढते उदरीं तुमची सान !

* * *

# अजूनही तूं तीच आहेस !

अजूनही तूं तीच आहेस !
तुझ्या भुकेसाठीं मीं मुकें श्वापद मारलें
तुझ्या निवाऱ्यासाठीं मीं पहाड कोरले
तुझ्या सुखासाठीं मीं दुसऱ्याचें गोधन चोरलें
दुसऱ्याच्या रक्तानें रंगलों, तेव्हां तूं माझे गोल चावलेस
अजूनही तूं तीच आहेस !

आपल्या नम्रतेनें तूं मला उबारा दिलास
आपल्या सर्वांगानें माझ्या सर्वस्वाचा घांस केलास
माझा सजीवपणा सादृश्यासह उदरांत वाढविलास
माझ्याच प्रतिमेच्या बंधनानें तूं मला बांधलेंस
अजूनही तूं तीच आहेस !

अजूनही तुझ्या दास्यांत माझें शौर्य फुलतें आहे
तुझ्या तहानेसाठीं माझें जीवन हलतें आहे
तुझ्या जवळिकेसाठीं माझें काळीज उलतें आहे
माझ्या लोखंडाचा लोहचुंबक आहे तुझ्या पापणिचा केंस
अजूनही तूं तीच आहेस !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम .......... वि: ..........
क्रमांक .......... नों: दि: ..........

# चोर बाजार

नको रचाया अभंग, गाथा
संसाराचा त्यागहि नलगे
थोडी अक्कल, थोडा वशिला
नरास गगनीं चढवी वेगें. १

विमान येतें, घेउन जातें
वैकुंठाहुन सुन्दर देशीं
इकडे कीर्ति, तिकडे स्वागत
स्वातंत्र्याची किमया ऐशी. २

असाच होता भुक्कड कोणी
शब्दजुळारी कवी भुकेला
एक निघालें संस्कृतिमंडळ
त्यांत तयाचा क्रमांक आला ३

विदेशवेडी शासनसंस्था
विमानमार्गें धाडित होती
सख्य, संस्कृती जोडायास्तव
परदेशाप्रत कांहीं व्यक्ती. ४

खरेच ज्ञाते होते कोणी
कुणी जाणते ललितकलांचे
खोगिरभरतीसाठीं वरती
सगेसोयरे मंत्रिजनांचे. ५

क्रमांक त्यांतच आला होता
नूतन जागृत लोककवीचा
पश्चिमेस त्या जाणें होतें
आक्रमुनीया पंथ रवीचा. ६

मोबदल्यास्तव लिहिलीं होतीं
तुटकीं फुटकीं त्यानें कवनें
अचूक त्यानें तुकिलीं होतीं
गृहसचिवांचीं तत्त्वें, वचनें ७

लोकशाहितिल हुकुमशहांनीं
केला होता मान तयाचा
प्रचारयंत्रीं जडला होता
मळसूत्राचा[1] खिळा तयाचा. ८

मानधनाच्या दिडक्यांमधुनी
सारभात तो होता जेवित
शुभ्र पांढरें पेहरत होता
उर्वरितांचे सावण लावित. ९

नियतकालिकां दादहि नव्हती
प्रांतांतिल या महाकवीची
स्वराज्यांतही सरली नव्हती
मिरासदारी साहित्याची १०

जिकडे धाडिल तिकडे कविता!
परत न आली, कुणि न छापिली
अचुक परतिचीं लाटुन तिकिटें
कृतीस त्याच्या धूळ-टोपली. ११

असा उपेक्षित कवी आज तो
उडत निघाला होता आतां
टोपल्यांतुनी कां नच यावी
वरती त्याची कवित्वगाथा! १२

१ मळसूत्राचा खिळा म्हणजे स्क्रू. परभाषा टाळण्यासाठीं हा खटाटोप.

अखबारांनीं आज तयाचें
नांवाहि होतें ठळक छापलें
जितणाऱ्यांच्या जंत्रीमध्यें
जसें असावें ‘हेंहि पळालें’![2] १३

खुषींत होता कवी बिचारा
भाग ताठवुन टोपीखालीं
तळावरी त्या निरोप द्याया
नव्हती आली जरी नवेली १४

अन्य सदस्यांभंवतीं होत्या
गुलाबकलिका, लिली डेलिया
सळसळ साड्यांमधुनी होता
उरास त्याच्या डसत जंबिया[3] १५

असो, लाभ तो नव्हता त्याला
दिंठी दिठीच्या डंख सुखाचा
भाग्य थोडकें हेंही नव्हतें
प्रवास सुखकर आणि फुकाचा! १६

शिडी चढुनिया गेले वरती
भारतभूषण सर्व प्रवासी
रुमाल हलवीत होते खालीं
उरोज कंपित, हात गुलबशी. १७

यानाआधीं नभीं उडाला
कवी बापडा स्वप्नासंगें
‘असले कुठले तुझीया दैवीं!’
कोलाहल त्या गर्जुन सांगे. १८

त्या यानाच्या तोंडावरचा
फिरूं लागला अजस्र पंखा
पोटीं घेऊन पाय उडे तें
आकाशीं हो सुस्थिर नौका. १९

हवेंत गेला कवी सदाशिव
भूमीवर ज्या नव्हता थारा
विमानांतल्या गगनपरीचा[4]
दुरुन लाभला त्यास आसरा. २०

कधीं नव्हे तो कवी मराठी
वाऱ्यावरती स्वार होउनी
विमानांतुनी खराच गेला
ठाउक जें त्या फक्त पुराणीं. २१

कधिं न छापल्या त्याच्या कविता
त्या सर्वांच्या माथ्यावरुनी
कवी सदाशिव पोहत होता
उच्चभ्रूंचा बाप होउनी. २२

तळीं राहिली मुंबानगरी
गिरगांवांतिल काळी खोली
मद्रदेशि तो अन्नविधाता
धमक्यांसंगें [illegible] २३

---

२ Also Ran हें Expression मराठींतहि चालून जावें.

३ येथें थोडें नवकाव्यासारखें झालें आहे पण चालू मोसमाचा परिणामच नाहीं अशी कृति व माणूस विरळाच.

४ विमानपरी म्हणजे Air Hostess.

## चोर बाजार *

ग्रंथ संग्रहालय
ठाणे
प्रा. क्र. ... १०१

यक्षनगरिच्या घनदूतांची
काव्यामधली मिरास तोडून
कवी सदाशिव पुढें चालला
अन्यायांची जमीन सोडुन. २४

कल्पनेंतही त्यास न सुचला
प्रवास असला नवल परीचा
दिमाख नाहीं उरला त्याला
युगकर्त्यांच्या 'म्हातारी' चा ![5] २५

२

आणि अचानक एके दिवशीं
हिरव्या[6] पिंगट तिसऱ्या प्रहरीं
'नभोवाणि'वर आली वार्ता
विमान बुडलें महासागरीं. १

अपघाताची बात सांगण्या
खास निघाले अंक लगोलग
'महासागरीं बुडलीं रत्नें'
भरतभूमिची झाली तगमग २

५ युगकर्त्या केशवसुतांची 'म्हातारी' नामक कविता आहे हें सांगणें न लगे, पण—

६ तिसरा प्रहर नुकताच पिंगट होता, पण ऋतुज्ञानहि व्हावें यास्तव 'हिरव्या' ची योजना.

दिल्लीश्वर अन् गल्लीश्वरही
दावुं लागले दुःख प्रयत्नें
महोदधीनें[7] परत घेतलीं
अशीं अचानक चौदा रत्नें ! ३

त्या चौदांच्या यादीमाजीं
नांव आमुच्या सदाशिवाचें
नांवासंगें चित्राहि यावें
इतुकें नव्हतें भाग्य तयाचें ! ४

छायाचित्रें होतीं तेरा
चौदावी पण चौकट कोरी
म्हणून गेले केशवसुत ना
केश्ण[8] कवीचें रूप विचारी ? ५

कुठेंच नव्हता आला फोटो
शब्दजुळारी सदाशिवाचा
चितारलाहि नव्हता कोणी
पडेल मुखडा त्या लुकड्याचा ६

तेंच नेमकें कारण झालें
अधिक वाढण्या त्याची कीर्ति
सुचेल तैशी वर्णुं लागले
बोलघेवडे त्याची मूर्ति ! ७

७ समुद्रमंथनांतील समुद्र हा नसावा पण 'निरंकुशाः कवयः।'

८ 'कवि तो होता कसा आननीं ?'

मूर्तीसंगें स्फूर्तीचे ही
पवाड झाले सदाशिवाच्या
पडला जेथुन, त्याच्यावरती
त्यास लागल्या नेऊं वाचा ! ८

महासागरीं बुडता कवडा
महाकवीची पावे पदवी
मरता झाली दिगंत कीर्ति
'हाय हरपला हिरा हिंदवी !' ९

अशा हरपल्या हिऱ्यास पडले
बघतां बघतां शंभर पैलू
नांव तयाचें घेऊं लागल्या
कोकिळकंठी मीना माळू ![९] १०

हें देखाया, हें ऐकाया
उरला नव्हता कवी सदाशिव
शंख शिंपल्या धुंडित होता
देह तयाचा अनित्य पार्थिव ! ११

आणिक इकडे वाढत होतें
प्रचंड त्याचें कीर्तिवैभव
कुणीं छापल्या स्मृती तयाच्या
कुणी शोधिलें उनाड शैशव ! १२

मिळेल त्याची ओळ तेवढी
त्रिवार झाली पुनर्प्रकाशित
बियावांचुनी वेल वाढली
गगनचुंबिका अशी अकल्पित ! १३

९ 'तरुण स्त्रिया' इतकाच अभिप्राय.

वात वातिला लागुन व्हावी
नेत्राल्हादक जशी दिवाळी
बात लागुनी बातेलागीं
तशी भडकली एक अशोळी १४

आरोळी त्या आवाजानें
जागा झाला एक प्रकाशक
म्हणे 'काढुं या अशांत आतां
सदाशिवाचें कवितापुस्तक !' १५

प्रकाशकाचें भाग्य थोर त्या
जागी झाली स्मृती तयाची
वर्षामागें आली होती
एक चोपडी सदाशिवाची. १६

चूडामणिनें[१०] धुंडधुंडली
अलमाऱ्यांचीं साऱ्या पोटें
कांहीं केल्या त्यास स्मरेना
कवी सदाशिव लपला कोठें ! १७

आठवला त्या कवी सदाशिव
आठवले ते शब्द तोतरे
आठवले ते पिवळे कागद
काकपदांसम दिव्य अक्षरें ! १८

आठवलें तें, पण गावेना
गडबड घाई, तगमग गोंधळ
चाळुं लागला रद्दी चिंध्या
बावरलेला चू० का० ढोबळ १९

१० चूडामणि काशिनाथ ढोबळ.

एके काळीं चू० का० ढोबळ
ग्रंथप्रकाशक होता मोठा
मोठ्या ग्रंथप्रकाशनें पण
बसली टोपी, आला तोटा. २०

ज्या ग्रंथाच्या प्रकाशनानें
सरली होती त्याची सद्दी
तोलुन होता विकीत आतां
त्या ग्रंथांची नवीन रद्दी ! २१

सदाशिवाच्या, कीर्तिघोषें
ज्वालमुखिसा आज अचानक
समग्र जागृत झाला होता
चूडामणिंतिल सुप्त प्रकाशक २२

काय म्हणावें दैव शिकंदर !
कोळशांतुनी हिरा सांपडे
शोधित असतां रद्दी चिंध्या
सदाशिवाचें मिळे चोपडें ! २३

वेळ कशला लाविल कोणी
सुवर्ण भाकित हातीं येतां
ग्रंथागता हो बघतां बघतां
सदाशिवाची समग्र कविता ! २४

मुखपृष्ठावर कुणी अप्सरा
उभी कवीचें नांव रेखुनी
तळीं अक्षरें सुवर्णमुद्रित
"चू०का०ढोबळ आणि कंपनी." २५

## ३

प्रकाशनाच्या आधीं खपल्या
प्रती भराभर त्या ग्रंथाच्या
जिकडे तिकडे एक बोलवा
'समग्र कविता सदाशिवाच्या !' १

गरम[11] चपात्यापरी संपल्या
पांच आवृत्ति बघतां बघतां
जुलाब्यासही पाठ जाहली
सदाशिवाची समग्र कविता ! २

नभोवाणिवर गाउं लागले
बृहन्नडेचे नवीन चेले
पाठ्य पुस्तकांमधुनी सहजीं
त्या काव्यांचे तुकडे गेले ! ३

'व्हीलर' वरती उठूं लागल्या
खिशांत[12]-बसत्या प्रती सानशा
अखबारांतुन चालू होता
जाहिरातिचा अखंड ताशा. ४

गवता ऐशी वाढे कीर्ति
ग्रंथासंगें प्रकाशकाची
भाषाभगिनी मिळून आल्या
दृष्ट काढण्या मराठियेची ! ५

---

११ Hotcakes पेक्षां का चपात्या बेचव असतात ?

१२ Pocket-Edition चें मराठी

प्रकाशकाच्या आधिन होते
प्रकाशनेतर हक्क सर्वही
प्रांतोप्रांतीं वाढुं लागलें
सदाशिवाचें नांव प्रत्यहीं ६

वंग, गुर्जरी, तेलगु, तामिळ
तशी असामी कन्नड उडिया
बघतां बघतां हो भाषांतर
सदाशिवाचें भाषांतुन या ! ७

हक्कासाठीं घेउन रक्कम
जमवी ढोबळ[१३] बराच गल्ला
मेलेल्याच्या मालावरती
शहाजोग तो मारी डल्ला ८

भरून आले किती रकाने
किती वाजलीं सभांत तोंडें
अटकेकटकेवरी पोंचले
सदाशिवाचे झुलते झेंडे ९

बडा शेटिया झाला ढोबळ
शान वाढली उमाप त्याची
मेजावरती ‘फोन’ किणकिणे
बुडाखालतीं फिरती खुर्ची. १०

---

१३ हा विनोद जरा ढोबळ आहे, पण प्रकाशकाचें नांवच ढोबळ होतें, त्याला काय करणार ?

उसंत नाहीं त्यास घडीभर
बोलायास्तव जरा कुणाशीं
जिवानिशीं तो कवी संपला
प्रकाशकाची चंगळ ऐशी ! ११

परदेशांतुन रोज मागण्या
सदाशिवाच्या धाडा कविता
किती दाम ते उत्तरिं सांगा
हक्क ‘फलाण्या’ भाषेकरितां १२

प्रती, पुस्तकें, ढिगांत त्यांच्या
ढिगासारखा फुगला ढोबळ
पाय अडकुनी पडली होती
त्याच्या दारीं कमला चंचळ. १३

पतपेढ्यांतिल फुगतां ठेवी
आंस वाढली प्रकाशकाची
पुनः पुनः तो छापूं लागे
नवीं पुस्तकें त्याच कवीचीं १४

दर पानाला बारा आणे
भाव पाडला प्रकाशकानें
पोटार्थी अन् कवी जुंपले
सदाशिवाचीं रचण्या कवनें १५

सागरांत का कळतें कोणां
कुणा नदीचें कुठलें पाणी
सदाशिवाच्या संगें झाली
कैक कवींची पावन वाणी ! १६

शेषशायिच्या उदरावरती
फुलांत जैसें ब्रह्म चतुर्मुख
सदाशिवाच्या प्रेतावरती
तसाच बसला सुखी प्रकाशक १७

सदाशिवाच्या नांवावरती
एक छापुनी चरित्र द्यावें—
प्रकाशकाच्या मनांत होतें
मिळेल तितुकें द्रव्य लुटावें. १८

प्रकाशितांचें जरा ‘ खाजगी ’
जनाभिरुचिला अतीव रुचतें
अचुक गावतां आज आवडी
तींत कालचें शिळेंहि पचतें ! १९

कुणांकडुनिया लिहवुन घ्यावें
सदाशिवाच्या आत्मचरित्रा
तृप्त तनूंतिल जागृत मेंदू
हेरित होता नवा पवित्रा २०

बसून फिरत्या खुर्चीवरती
चोळित होता डोकें ढोबळ
भर बाराचा सुमार होता
गिऱ्हाइकांची नव्हती वर्दळ. २१

तोंच अचानक आलें कोणी
ढोबळ यांचें नांव विचारित
शुभ्र नेसली, मलूल तरुणी
शिक्षिकाच ती असेल निश्चित २२

एक सैलसर घेउन चक्कर
बसल्या बसल्या खुर्चीवरती
प्रश्नांकित तिज पाही ढोबळ
खालीं चष्मा, डोळे वरती २३

पडका तरिही थोडा चिडका
त्या तरुणीचा साद उमटला
“ कुणीं अनुमति दिधली आणि
कैसा तुम्हीं ग्रंथ छापला– ? ” २४

बसल्या ठायीं प्रकाशकाला
जिताजागता पडला चकवा !
समोर होती उभी तयाच्या
सदाशिवाची पत्नी विधवा ! २५

## ४

काय करावें तेंच सुचेना
बसल्या जागीं खिळला ढोबळ
बर्फ खंडसा थंड होउनी
पडला खालीं, आली भोंवळ. १

मदासारखी भोंवळही पण
उतरायास्तव चढते माथीं
शुद्धी येतां कळलें त्याला
कवीजनांना असतीं नातीं २

उठतां कलला पुनश्च ढोबळ
कविजाया ती त्यास सांवरी
गिळुन आवंढा, पाय आपटी
कटीं खोंचला पदर आंवरी ३

" मी अन्नाविन मरतें आहें
कवी सागरीं बुडून मेला !
साहित्यावर तुम्ही त्याच्या
काय बांधितां नवीन इमला ? ४

अशीच जातें शोधित पत्ते
पत्रचालकां सर्व भेटतें
आणि टांगते वेशीवरती--"
पुढें हुंदके, शब्द निसुटते. ५

जाहिरातिचें महत्त्व होतें
प्रकाशकाला नुकतें पटलें
'बनी बनाई पार बिघडली'
पराजिताचें मन पुटपुटलें. ६

ढसांढसां तो प्याला पाणी
आणि कोरडे शब्द बोलला
" ठाउक नव्हतें मजसी बाई
अर्धा हिस्सा देतों तुजला. " ७

त्या शब्दांनीं विलीन झालें
प्रकाशकाचें राज्यच अर्धें
" ठीक जाहलें, बला टळाली
तूंच तारिणी, माय शारदे ! " ८

" आनिष्टांतुनी इष्ट उपजलें
कांहीं थोडा बसेल चट्टा
कविजायाकृत चरित्र कविचें
शकेन मिळवूं मीच एकटा ! ९

होतो आहे होउं देत तो
नफ्यांत माझ्या अर्धा तोटा
प्राप्तिकरास्तव सिद्धच आहे
स्वच्छ वह्यांवर हिशेब खोटा." १०

अर्ध क्षणाच्या अर्ध्या समयीं
विचार इतुका करुन मानसीं
'बसा' म्हणाला प्रथम प्रकाशक
अवघडलेल्या कविभार्येसी. ११

बसला ढोबळ, बसे वत्सला
समझोत्याचा झाला कागद
सुखें शृगालिस खाऊं देतो
वनराजाही अपुली पारध ! १२

इसार म्हणुनी दिधल्या त्यानें
दहा दहाच्या शंभर नोटा
कागद ठेवायास्तव जपुनी
'चू. का. ढोबळ' छाप लखोटा. १३

शीत पेय मग झालें त्यावर
शीतळली अन् दुपार थोडी
' चरित्र गुंफा पतिदेवाचें '
करी प्रकाशक लाडीगोडी ! १४

ऐकतांच हे शब्द तयाचे
रडूं लागली उगा वत्सला
' उरल्या आतां स्मृतीच नुसत्या ! '
आणि हुंदका नवा दाटला. १५

'मरणाधिन हा मनुष्य-प्राणी
घडलें तें तर गेलें घडुनी
अपणांसाठीं ठेवुनि अमृत
गेला तुमचा गरूड उडुनी .' १६

कविकान्तेच्या सांत्वनसमयीं
कवित्व सुचलें प्रकाशकाला
तबला पेटी शिरीं वाहतां
गीत सुचावें जसें हमालां ! १७

'लिहीन त्यांचें चरित्र आतां '—
स्फुंदत बाले सती वत्सला—
'तवा तापला आहे तोंवर
करा फोडणी लसूण सोला !' १८

या उपमेनें पटली महती
पाकनिपुण त्या कवीकलत्रा
'उद्यांच करितें शुभारंभ मी
लिहावयासी कवीचारित्रा. १९

द्रव्य, लिफाफा, निरोप 'वंदे'
इतुक्यासह ती उठली महिला
आस्थेवाइक चू. का. ढोबळ
पुनश्च खुर्चीमाजीं पडला. २०

घरीं परतली जधीं वत्सला
हज्जाराची घेउन रोकड
बंद कवाडापुढें तियेच्या
घेणारांची होती झुंबड ! २१

परीट, गवळी, पेपरवाला
नाक्यावरचा बुटका वाणी
झाडुन सारे जमले होते
ज्यांचीं ज्यांचीं होतीं देणीं ! २२

पै-पैशासह देउन देणीं
मुक्त जहाली प्रथम वत्सला
स्वच्छ ठेवुनी कवाड उघडें
देह तिचा मग खालीं बसला. २३

भटकत होतें चित्त परन्तु
कवीचारित्रामार्गे कोठें !
कसें निभावुन न्यावें आतां
कसें लिहावें मुळांत खोटें ! २४

नव्हती जाया अजुन कुणाची
कुमारिका ती दीन वत्सला
सौभाग्यच जर नव्हतें आधीं
वैधव्याचा संभव कुठला ? २५

५

असेच गेले कांहीं महिने
कविकांतेनें नाहीं गणिले
कवीचरित्रें आणुन कांहीं
प्रसंग त्यांतिल निवडुन विणले[१४] १

---

१४ विणकाम ही फक्त स्त्रियांचीच कला आहे.

असें चाललें चरित्रलेखन
प्रकाशकाचा गिळीत मलिदा
फुका पासरी महाग नव्हता
भांडवलाविन अल्प फायदा ! २

निर्वातांतिल वास सोडुनी
नवीन घेई फ्लॅट वत्सला
कवीचरित्रा गुंफायास्तव
एक ' लेखकू ' तिनें ठेविला ३

रोज सकाळीं शुभ्र नेसुनी
उदबत्त्यांचीं लावुन झाडें
सांगत होती कविभार्या ती
कविराजाचे जुने पवाडे ! ४

टिपून होता घेत लेखकू
तिच्या मुखांतिल पडतें अक्षर
कवीचरित्रा येउं लागलें
रूप कांहिंसें गूढ मनोहर ! ५

सहवासानें प्रीत वाढली
अकल्पितानें डाव साधला
मुक्यासारखी बसूं लागलीं
लेखकु आणि सती वत्सला ! ६

एक थांबलें चरित्र आणि–
घडूं लागलें दुसरें कांहीं
उघड बोलण्याइतकें साहस
नव्हतें पण त्या दोघांनाही. ७

पार थांबलें लेखन आतां
बोलुं लागल्या दोन्ही नजरा
त्या विधवेच्या वेणीमाजीं
एके दिवशीं आला गजरा ! ८

हळूं हळूं मग फुटूं लागल्या
भीत मनांना कांतर वाचा
' प्रतारणा मी करतें आहें ! '
' चाकर देवी मी पण तुमचा ! ' ९

' भाळावरच्या हिरव्या रोपां
येइल का कधि नवा फुलोरा ? '
' स्वीकारूं मी कसा वत्सले
त्या देवाचा हा देव्हारा ? १०

एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं
चौपाटीच्या वा ळू व र ती
अंधारांतच बसल्या होत्या
प्रीत-भारल्या दोन आकृती ११

पार्श्वसंगिता सागर-गर्जित
जुनी नायिका नवखा नायक
गोड झिणझिण्या छेडित होता
शब्दाआधीं मन्मथ गायक ! १२

जरा खळाळुन गेले आंसू
श्वास आंसवा बाजुस सारी
म्हणे वत्सला, ' प्रिया केशवा,
मी नच विधवा, अजुन कुमारी १३

टुणकन् मारी उडी लेखकू
घामाघुम हो त्याची मुद्रा
" अथांग असतें अबला जीवन
तुझ्याहुनीही खोल समुद्रा !– १४

ऐक सांगतों मीही राणी
गूज राखिलें आजवरीं जें
ज्यास गुंफिसी तूं स्वेच्छेनं
तें तर आहे चरित्र माझें ! १५

मीच कवी तो बुडलों होतों
व्योमामधुनी महासागरीं
दुर्दैवानें तगलों आलों
मुंबापुरितें या माघारी. १६

कसा वांचलों, कैसा जगलों
कथा सुरस ती केवळ अद्भुत
खण्डकाव्य तें कधीं लिहावें
ऐसें आहे अजुन मनोगत १७

परत पाततां, मला उमगलें
माझी कविता खपली पुष्कळ
आणि तियेवर गबर जाहला
फुका प्रकाशक चू. का. ढोबळ.' १८

धुळाक्षरें अन् अंकलिप्यांहुन
त्यास जाहला फार फायदा
दिडकी नव्हती माझ्यापाशीं
धुंडायास्तव परी कायदा ! १९

त्याच्या दारीं गेलों अवचित
नव्हती कांहीं ओळख पाळख
काव्यग्रंथ पण पाहुन झालें
शतजन्मांचें माझ्या सार्थक ! २०

' मीच कवी तो ' म्हणुन सांगतां
खुर्चीवरती पडला ढोबळ
चमत्कार हा ऐकुन त्याला
क्षणांत आली होती भोंवळ ! २१

शुद्धीवरती येतां त्यानें
कथिलें मजसी अमोल कांहीं
' महत्तता या वाङ्मयप्रांतीं
मेल्यावांचुन मिळणें नाहीं ' ! २२

' मेला म्हणुनी मोठे झाला
जिवंत होतां फुटेल भांडें
ही कीर्तीची सोनकोंबडी
मेल्यावरती घाली अंडें ! २३

जगायचें तर ' मृत 'च राहुं द्या
कवी सदाशिव मेला तैसा
पत्नीपाशीं रहा तुम्ही जा
तिला दिलासे अर्धा हिस्सा ' २४

' मी तर होतों भणंग कवडा
कुठली पत्नी असेल मजला ?
प्रकाशकानें दिधला पत्ता—
' फुले इमारत, तिसरा मजला. ' २५

‘ याच्यापुढचें तूंहि जाणसी
तुझा ‘ लेखकू ’ तोच सदाशिव
आत्मा माझा तुझ्या संगतीं
मेला गेला—सरला पार्थिव ! २६

खरेंच आतां चरित्र माझें
मीच सांगतों तुला वत्सले
प्रकाशकाला देउन राणी
वसूल कर तूं द्रव्य आपुलें. २७

या प्रीतीच्या जगण्यासाठीं
मृतच राहुं दे मजसी लोकीं
तूं विधवा मी कुमार लेखक
नको धरूं तूं जमेस बाकी. २८

तुझ्या नि माझ्या सहवासाच्या
उठतिल कंड्या खूप साजणी
आणिक माझ्या ‘ चरित्रग्रंथा ’
येइल राणी खूप मागणी ! २९

तूं मी आणि चू. का. ढोबळ
असा त्रिवेणी जमला संगम
सरस्वतीसह गुप्त त्यांत मी
कमवूं दौलत स्थावर जंगम ! ” ३०

* * *

# घे तसला अवतार

शारदे, घे तसला अवतार !
अज्ञानाचें वारुळ फुटलें
शांतीसंगें ज्ञान प्रगटलें
तुझ्या स्वरूपीं विलीन झालें
वाल्मीकीच्या वाणीचा मग देवावर अधिकार !

आप्तवधाला अर्जुन भ्याला
रथाखालतीं स्तब्ध राहिला
गीतावचनें पाजुन त्याला
पार्थिव देहांतुनी फुलविला कृष्णें खदिरांगार !

संन्याशाचा पोर भिकारी
धरणें धरितां तुझिया दारीं
पावलीस त्या शब्दसुंदरी
महिषमुखानें ज्ञानदेव तो घडवी वेदोच्चार !

सज्जनगडचा समर्थ योगी
राज्य रंगवी भगव्या रंगीं
समूर्त झालें शौर्य विरागी
कुबड्यांमधुनी जन्म घेति मग खंजिर कैक हजार !

कोंडाण्याच्या कडेकपारीं
मालुसऱ्याची मर्द वैखरी
वीररसाच्या झाडुन फैरी
घरभेद्यांवर करी क्रांतिचा तेजोमय संस्कार !

प्राणपणानें लढा लढविला
गड वसईचा नाहीं पडला
वीर चिमाजी पुरता चिडला
शब्दासरशीं त्याच्या झाले कैक फिरंगी ठार !

साम्राज्याचा उमदा नोकर
भानावर ये पाहुन संगर
गोळ्या झाडित अधिकाऱ्यावर
मंगल पांडे गर्जत सुटला वेडा जयजयकार !

अजाण भेसुर, भयाण प्रांतीं
विनायकाच्या जिव्हेवरती
नाचलीस तूं करित झंकृती
'अवध्य मी' या मूक गायनें भरलें कारागार !

""चला चालते व्हा रे येथुन !"
आर्त महात्मा सांगे गर्जुन
त्या सादानें घुमलें त्रिभुवन
क्षणाक्षणाला घडव अम्हांला असले साक्षात्कार !

* * *

# वसंत व्यापारी

नील जळावर फुले ताटवा
कमलिनि नौका भृंग नाखवा
पेरुन मचव्यामागें मचवा
सौंदर्याचा सौदा करितो वसंत व्यापारी !

सामान्याचे साती सा ग र
लंघुन जातां, पै ल त टा व र
प्रां त लागतो अतिशय सुंदर
त्या प्रांताचा रहिवासी हा वसंत व्यापारी !

मदननृपाच्या रा ज धा नि चा
'नगरशेट' हा किताब त्याचा
मदनपुरांतील मा द क ते चा
देशोदेशीं प्रसार करि हा वसंत व्यापारी !

बाल्यामधल्या मुग्धपणाची
दौलत अपुली बहुमोलाची
सोड लाडके सोड गांठिची
सरोवरावर असे उतरला वसंत व्यापारी !

मदनपुराचीं मोहक लेणीं
नटव आपुले उरोज त्यांनीं
आतुरतेचें काजळ नयनीं
गालांवरची लाली विकतो वसंत व्यापारी !

जगाहुनी जें असेल न्यारें
करूं खरेदी तें तें सारें
नसानसांतुन त स लें वा रें
भरवुन घेऊं, लुटुनी राणी वसंत व्यापारी !

सरोवराच्या खो ल ज लां त
प्रतिबिंबें मग पाहूं शां त
वदशिल तूंही हांसत हांसत
वासंती मी, दिससी तूं तर वसंत व्यापारी !!

* * *

## कविताशाखेवरी वाल्मिकी

वैशाखांतिल दुपार तापद
खिडकीपाशीं उभी कधींची
चिवट भिकारिण मोंडपणानें
घेइ परीक्षा देणाऱ्याची १

बघवत नाहीं भेसुर चेहरा
वळवत नाहीं मानहि मागें
कानीं येती करुण श्वास ते
बंद करावे वाटे रागें २

झोळीमधुनी उरास लुचतें
तिला 'उद्यां'चें रोगी बालक
तशीच ठेवुन उभी तिला मी
चेपुं लागलों माझें मस्तक ३

जडावलेल्या डोक्यावरती
रुते अनामिक कांहीं ओझें
अंधारुनिया गेलें मानस
मला न दिसती विचार माझे ४

आंत धुमसत्या अबोधतेचा
डोळ्यांपुढती धूर पोहतो
सिगारेटचा केवळ चाळा !
कुठें तरी मी दूर पाहतों ५

उन्हांत काळ्या रस्त्यावरुनी
मोटरगाड्या पळती हरिणी
आणि घराच्या फोफाट्यांतच
रात जागले निजले प्राणी ६

कुठें विजेचा फिरतो पंखा
उबगुन घिरट्या घाली वारा
तलम मलमली कपड्यामागें
हुळहुळ गळती घामट धारा ७

वाळ्यामधुनी गाळुन घेती
कुणी तनूवर थिजले आंसू
शांत पेंगते हिंस्र जनावर
मनांत त्यांच्या रक्तपिपासू ८

दगडविटांच्या पोटीं दिसलें
असलें कांहीं हवें नको तें
गच्च्याछपरांवरी सारखें
अभाळ केवळ ऊन ओततें ९

ग्लानींतच मीं मिटले डोळे
नव्हे झोंप ती, नव्हे जागृती
निराश होउन दुपार फिरली
तळीं उतरलीं उन्हें रांगतीं १०

सैल नेसुच्या सोंग्यासम मीं
सहज टाकिला आळस खांदीं
खिडकींतच त्या दिसली सुंदर
गुल्मोहराची हलती फांदी ११

हिरव्यामधुनी डोलत होती
लाल फुलांची कोमल नक्षी
आणिक होता गात मजेनें
गीत अवेळीं वसंत पक्षी १२

कविताशाखेवरी वाल्मिकी
गातो कां हा भविष्यवाणी
पुन्हा व्हायचा ‘ राम ’ जगावर
सरुन जायचें राज्य रावणी १३

★ ★ ★

## कायाकल्प

जेथें होते रखडत नांगर
बैलामागें मारित रेघा
टोकरुनिया ढेकुळ काळें
जिराहिताच्या बुजवित भेगा— १

तेथें आतां फिरतो ट्रॅक्टर
विहिरीवरती बसलें एंजिन
सलग तरारे हिरवी शेती
उरली नाहीं ती दैवाधिन. २

शेवाळानें उदासलेली
जेथें होती धार वाहती
तेथें आतां धरण मनोहर
शेतें-भातें त्यावर पिकतीं. ३

फिरतें आहे पाणचक्र हें
निघे त्यांतुनी वीज गोरटी
वीज-दिव्यांनीं उजळुन गेलीं
कौलारांचीं नवीं खोपटीं. ४

जेथें होता लव्हारदादा
हिंगळ फुलावित मारित भाता
लोखंडावर हाणित टोले
पानांसंगें चघळित बाता— ५

तेथें आतां शेड करवती
यंत्र आंतुनी गातें गाणीं
निळ्या ढगांच्या तोंडावरती
धूर सोडिते जस्ती चिमणी. ६

जेथें होते बोळ वाकडे
फिरती त्यांतुन श्वानसूकरें
कुठें पोहिव्या म्हशी घालती
कुठें शिंकतीं मेंढ्या बकरें— ७

तेथें आतां सुरुंद सडका
दो बाजूंला खांब विजेचे
पार पाडले गेले वाडे
जुनाट रोगी अंगसुजीचे. ८

चिखलतळ्याच्या जागीं आतां
बालोद्यानीं फुलते डोळे
अफू पाळण्यावांचुन येथें
खेड्यामधलें शैशव खेळे ९

गांवदेविच्या देवळांतली
दमेकऱ्याची सरली पोथी
आज वाटितें ज्ञान खिरापत
प्रौढांच्याही राकट हातीं. १०

जेथें होत्या खिदळत बाया
शेजाऱ्याचें उणें काढतां
एकमेकिच्या माथ्यामधले
नखानखांनीं किडे मारतां— ११

तेथें आतां फिरती चरखे
सुया गुंफिती जीग रेशिमा
चुडे बांगड्या लयींत हलती
रंग आणिती अवघड कामा १२

खुळें कालचें खेडें झालें
उद्योगाची नवी वसाहत
खिंडारांतुन उठलें आहे
जननेत्याचें स्वप्न अकल्पित— १३

—हाय परंतु वारा तिथला
उगाच सोडी दीर्घ उसासे
म्हणे ‘ येथुनी गेलीं कोठें
जितीं जागतीं जुनीं माणसें ? ’ १४

★ ★ ★

# साताऱ्याची तऱ्हा

( लावणी )

घोळ निऱ्यांचा पदीं अडखळे, जलद चालणें जरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

तुरुतुरु चालसी नारी, चवड्यांवरी ग
उमटती फराटे पाउल वाटेवरी ग
येतसे कुणी का मागुन मागावरी ग ?
पदराआडच अरधामुरधा लपे तुझा चेहरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

डोळ्यांत बावळा अजुन नेणतेपणा ग
भाबड्या मुखावर गोंदवणाच्या खुणा ग
डोलतो उरावर मदनाचा पाळणा ग
पाळण्यांतलें पोर उसवितें चोळीचा कोपरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

सांवळी तरी तूं गोऱ्यांहून गोमटी ग
पट्ट्यांत चांदिच्या कशी बसविशी कटी ग ?
थोराड हाड या मुलखाचें शेवटीं ग
बुलंद दिसते तुझी इमारत, ठीक चिऱ्यावर चिरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

जाहली तुला ना चवदा वर्षें पुरीं ग
पोवळीं उमटलीं दोन्हीं गालांवरी ग
इतक्यांत निघे कां मुरमांतुन बाजरी ग ?
माहित नाहीं इष्क तुला पण भुइवरल्या पांखरा !
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

असतील ओठिं तव अजुन उखाणे म्हणी ग
तुज कशी कळावी रंगाची लावणी ग
कां उगाच मिटते माझी मग पापणी ग
खरीच मोठी होशिल तेव्हां भेटच या शाहिरा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

राहुं दे तोंवरी असेंच निरसें इसें ग
मी जपून ठेविन आंबट माझें पिसें ग
मंथनीं पहा मग लोणी निघतें कसें ग
आवडी प्रीतिनें तूंच पसर त्या लोण्यावर शर्करा
दिसे ही साताऱ्याची तऱ्हा

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
मेघदूत २१०२८ दि:
क्रमांक ९३५२ नों: दि:

जा घेउन संदेश !
मेघा, जा घेउन संदेश !
उल्लंघुनिया सरिता, सागर, नानापरिचे देश.

रणांगणावर असतिल जेथें
रणमर्दांचीं विजयीं प्रेतें
गगनपथानें जाउन तेथें
प्राणसख्याच्या कलेवराचा निरखुन बघ आवेश.

हाडपेर मैं थेट मराठी
हास्य अजुनही असेल ओठीं
शवें शत्रुचीं असतिल निकटीं
अंगावरती असेल अजुनी सेनापतिचा वेष.

अर्धविलग त्या ओठांवरती
जलबिंदूचे सिंचुन मोतीं
राजहंस तो जागव अंतीं
आण उद्यांच्या सेनापतिला जनकाचा आदेश.

डोळ्यांमधलीं तप्त आंसवें
थांबच देत्यें गड्या तुजसवें
पुढें न आतां मला बोलवे
सांग गर्भिणी खुशाल आहे पोटीचा सेनेश.

ज्योतीसाठीं जगेल समई
भिजविल तिजला रुधिरस्नेहीं
वाढत जाइल ज्योत प्रत्यहीं
नकाच ठेवूं आस मागची, इतुकें कुशल-विशेष.

* * *

# सह्या जाहल्या तहनाम्यावर

म्लान जहालीं घारगिधाडें
   सूप वाजलें आघाडीवर
मानवतेचे म्हणा पवाडे
   सह्या जाहल्या तहनाम्यावर.

शपथ घेतली जग-जेत्यांनीं
   शांति नांदवूं या विश्वावर
भयभीतांनो, बघा पर्वणी,
   सह्या जाहल्या तहनाम्यावर.

रणमर्दांनो, गाढ झोप घ्या
   ठेवून माथा पीन कुचांवर
नकाच राखूं स्मृतिही जाग्या
   सह्या जाहल्या तहनाम्यावर.

निःशस्त्रांनो, काय परजतां
   अधारांतच या निसण्यावर
खटाटोप हा व्यर्थ कशाला
   सह्या जाहल्या तहनाम्यावर.

गुलाम तुम्ही काय योजितां
   घेतां शपथा मुक्या भयंकर ?
गुप्त कटांनीं काय साधतां
   सह्या जाहल्या तहनाम्यावर.

ऊर बुडवुनी काय मागतां
   जगा लाभली स्वतंत्रता जर
ऐकलीत ना मंगल वार्ता
   सह्या जाहल्या तहनाम्यावर.

खुशाल आतां पिकवा शेती
  घाम गाळुनी तसूतसूवर
नाहीं दौलत सरकारी ती
  सह्या जाहल्या तहनाम्यावर.

नकाच दचकूं झोपेमाजीं
  बाळांनो, ही ऐकुन घरघर
आग न ओकिल विमान आतां
  सह्या जाहल्या तहनाम्यावर.

पूस विरहिणी डोळे आतां,
  आला दारीं विजयी प्रियकर
गाढ मिठींतिल मिळव मुक्तता
  सह्या जाहल्या तहनाम्यावर.

* * *

# युद्धानंतर

युद्धानंतर काय जगावर
राज्य नांदणें शांतीचें ?

युद्धानंतर चढतिल गगनीं
काय मनोरे नीतीचे ?

युद्धानंतर नंदनवन का
होइल अवघ्या विश्वाचें ?

—छेः छे नाहीं, युद्धोत्तर मग
प्रयत्न दुसऱ्या युद्धाचे !

* * *

## विसरतां विसरेना

विसरतां विसरेना
खेड्यांतली पाठशाळा
ऊब तुझ्या सांनिध्याची
तुझा मोरपंखी डोळा

विसरतां विसरेना
राय आवळ्याचें झाड
भुकेजल्या हातां चावे
भुऱ्या रेशमाची लड

विसरतां विसरेना
शुक्र ओढ्यांतील वाळू
रागें रागें लाल झाला
तुझा पदर मायाळू

विसरतां विसरेना
हातकंदील तो रिता
अंधारांत पोळलेली
'राम' कवींची कविता

विसरतां विसरेना
चढ-उतार जिन्याचा
सोनकांतींत जडला
स्पर्श अंधुक मिन्याचा

विसरतां विसरेना
तुझी गोरी अंगलट
देव जैनांचा नागडा
वास दीपाचा ओशट...

विसरतां विसरेना
प्राजक्ताची फुलझड
कुरवाळीत पारंबी
खोकलेला वृद्ध वड

विसरतां विसरेना
तुझ्या माझ्यांत दुरावा
उगा केव्हांतरी येतो
ओठां-डोळ्यांना ओलावा.

* * *

# अघटित

फिरत होता पंखा विजेचा
अमल सादवीत दुपारच्या निजेचा
मस्तक होतें रिकामें,
हात माझे आखडले सांगकामे

इतक्यांत झाला चिंवचिंवाट
अर्धजाग्या झोपेला वाटलें
झाली पहांट

उघडला पडदा पापणीचा
फिरत होता पंखा, विजेचा

त्या पंख्याच्या दांडीवर;
पॉलिशलेल्या पिवळ्या कांडीवर;
एक होती पांढरी तबकडी
तिच्यावर लपली होती हलकडी

तबकडी हलकडी यांच्यामध्यें
एक घरटें अगदीं साधें
फिरत्याच्या आधारावर
बेफिकिर स्थिरावलेलें घर

त्या घरांत चिंव चिंव बोबडी
नेणत्या पंखांची हालचाल भाबडी

मीं मानेचा कोन साधून पाहिलें
डोळे बघतच राहिले.

चोंची अबोली रंगाच्या
आकृति तगरीच्या अंगाच्या

खसपसत होती बाळभूक
नेणिवेंतहि ही जाण आपसूक
खिडकींतुन आली एक वायुलहर
पंखासकट घरट्यांत पोंचली, वर.

इवल्या इवल्या चोंचीजवळ
एक चोंच पोंचली, टणक सढळ

तिची भूक मनाची
त्यांची भूक कणाची
माय, लेक
माय, लेक
चार चोंची दाणा एक.

वात्सल्याचें जिवंत गान
चढे उतरे सपंख तान
मिनिटां मिनिटांवर सम
मुरकी फिरत नाहीं दम

मी गाणें बघत होतों
मान हलवित डोलत होतों

एक तान जातां थेट,
माय-मुलांची पुनश्च भेट
पुन्हां हवेंतुन मारित सूर
गिरकी, फिरकी ढळता सूर

एक तान, दुसरी तान
बघतां बघतां विसरे भान

विसरच पडला बेसुरतेचा
फिरत होता पंखा, विजेचा.

माझ्या मनाएवढा होऊन विस्तार
पुरता रंगला वत्सल-बहार.

तोंच...खालीं घेतां धांव
फिरता बेसुर घाली घांव
जलद उतरतां, तुटला सूर
मेली ममता, पडली दूर

भूमिवरती पडलें गीत
अगदीं निपचीत, अगदीं निपचीत
वरती उरली होती आंस
खालीं केवळ अंतिम प्यास

मी उठलों तत्क्षणीं
अंगुष्टभर घातलें मुखांत पाणी
परंतु नाहीं झाली फडफड
मेली चोंच, मेलें धड

तें गोठलेलें संगीत
शुभ्र पांढरें, रक्तांकित

रेशमाच्या नजाकतीनें उचलीत
मीं हलकेंच ठेवलें, खिडकींत
त्याच्याकडे देखवेना
तें बाहेर पण टाकवेना

श्रवणीं ध्रुपद तेंच चालूं
'ये ग आई, चारा घालूं'

तोंच खिडकींतल्या कलेवराजवळ
एक भरारी थांबली चंचल
काळें माथें, काळी मान,
छातीवरती लव अभिमान

गळत्या डोळ्यांनीं मी बघत होतोंच
इकडे टोंच, तिकडे टोंच.
मादीच्या कलेवरावर, नराची चोंच.

पुढें घडलें तें जगाआगळें
मृत गीताचे विरजलेले डोळे
त्या दुष्टानें खाऊन टाकले
मेलें शरीर खालीं फेकलें

नासून गेलेलें थंडगार दुभतें.
तें पिऊन, उडून गेलें जीवन उडतें
वरच्या नेणिवेला कळलें नाहीं
ध्रुपद चालूच "आई–आई"

माझें मन उडालें
उडतांना इवलें झालें. इवली चोंच, पंख चिमुकले
त्यालाहि जाण उरली नाहीं
तेंहि किलबिलूं लागलें
'आई, आई'

बेसुराला पत्ताहि नव्हता या अघटिताचा
फिरत होता खालीं पंखा विजेचा.

* * *

# माझ्या समाधीवर

अवजड या दगडाखालीं  गाडला दगड दैवानें
आंकारहि नव्हता त्याला  मग कुठले रेखिव कोने ?
मूर्तिकार तुडवुन गेले  उलविलाच नित्य उन्हानें
फेंकली लाखदां धूळ  उपहासें त्यावर पवनें

झुकल्या न कधीं फुलवेली
शिरिं सुमनें ढळतिल कुठलीं ?
ना ठाउक छाया कसली

थांबला न माथ्यावरती  भटकतांहि मेघ श्रमानें.

कंटाळुन त्याच्या दुःखां  ऐकुनी मुक्याचें कण्हणें
घेतला पोटिंचा गोळा  पोटांत पुन्हां धरणीनें
थबकतां कशाला रसिका  या जागीं औत्सुक्यानें
मातींत सुखें निजवीला  कुणि दुःखी यमधर्मानें

जा खुशाल घालुन वळसा
पुसुं नका उगा इतिहासा
हा जगला मेला कैसा

मातीस मिळाली माती  मोलाचें येथ न सोनें.

* * *

# एक पांखरूं

ऐन वयाच्या वसंतकालीं
फिरे सुरंगी कळ मखमाली

सादावांचुन उभवित पंख
कळीकळीवर मारी डंख

आकाराविन दिसे पांखरूं
हळूंच लागे गंध पोखरूं !

अलगद टाकी नसतां भार
चपल पापणी लवली पार

गालीं बसलें केवी उठवूं ?
फुलती लज्जा कैसी मिटवूं ?

मनांत शिरला बाई चोर
शहारलें मी नवखी पोर

वक्षीं त्याचीं चरणें रुपतीं
कमलकळ्यांचीं अग्रें दुखतीं

कटि कंपित हो, गळले पाय
वेल पांखरां भ्याली काय ?

एक पांखरूं बाग थरकवी
पीडा देतच, फुलें हरखवी !

* * *

# संगीतिका

१. अमृतवृक्ष

२. व्याध

# अमृतवृक्ष

— १ —

पत्नी... जागे व्हा प्रियकरा
गजर करुनिया घड्याळ चुकलें
अखंड वटवट करितां थकलें
हात ताणिते हळूं चिमुकले
कुशी बदलली नाहीं आपण, नाहीं हलला जरा
तरुशिखरांवर रविकर पडले
कळयाफुलांचे नेत्र उघडले
खिडक्यांवरचे पडदे चढले
घराघरांचीं खुलीं कवाडें जागृति ये नगरा
' दोन दलांसह एकच कलिका '
ज्ञात असा जो तीनाहि लोकां
चहा सिद्ध मीं केला रसिका
भूलोकींचें उष्णामृत हें, आदर याचा करा

पति... [ मोठ्यानें जांभई देत ]
रम्य हा प्रभातकाल, मोहिनीच तूं सखी
उष्ण उष्ण भूसुधा, तूंच घाल या मुखीं

पत्नी... काय हें अवखळ तरि वागणें !
किती उशीर झोंपणें
उठा कसे, बसा असे
पुन्हां कशास शाल ही, पुन्हां कशास घोरणें

पति... [ चहा पितां पितां ]...
कशाचा सुटला सांग सुवास ?
कसलें अत्तर सांग सखी तूं लाविमलें वसनास ?

पत्नी... कवी म्हणवितां तुम्ही स्वतःला—
आणि प्रभातीं गाढ झोपला
माहित नाहीं काय होतसे आज सुरू मधुमास

पति... कशाचा सुटला सांग सुवास ?

पत्नी... अजुन नाहिं का निद्रा सरली ?
पुन्हा चहा घ्या, किटली भरली
कवी असुनीहि नोळखतां का वासंतिक वाऱ्यास ?

पति... कशाचा सुटला सांग सुवास ?

पत्नी... काय सांगुं मी कपाळ माझें
अजुन पापण्यांवर कां ओझें
प्रथम दिवस हा नववर्षाचा, भर आला सुमनांस

पति... कुठलीं सुमनें, कुठल्या वेली
गिचमिड वस्ती, नगर बकाली
रूपधूलि तूं काय लाविलिस नवीन निजवदनास
कशाचा सुटला सांग सुवास ?

पत्नी... इतका कसला त्यांत अचंबा
मोहर आला त्या कडुनिंबा
वाऱ्यावरती वाहत येतो कडवा मधुर सुवास !
या वृक्षातें आज पूजिती
फुलें पालवी सकल सेविती
अर्थ यांतला असेल ठाउक तुमच्या कविहृदयास
तारामंडित नील नभासम
प्रसन्न दिसतो दुरुनी हा द्रुम
कटुता कां मग निसर्ग देतो या मंगल वृक्षास ?

पति... कडूनिंब कां कडू जाहला तें मजसी ठावें
शिष्ये, गृहिणी, पुराण त्याचें सावध ऐकावें

पत्नी... पंडिता, सुखेन सांगावें...

पति...		सकल औषधींचा जो नाथ, तया आठवुनी मानसांत
बंधु तयाचा सुविख्यात, तो धन्वन्तरी नमिला मीं।
नमियले अश्विनीकुमार, सुश्रूतादि ग्रंथ, ग्रंथकार
नमूनियां वनस्पती अपार, नमितों श्रवणें श्रोत्यांचीं ॥
वेदपूर्व ही कथा लाडके, वेदपूर्व तें जग
जेव्हां होती खगास वाणी, सपंख होते नग
दक्षप्रजापति चंद्रा अर्पी सत्ताविस कन्या
अश्विनि, भरणी, मघा, रोहिणी इत्यादि धन्या
नक्षत्रें त्या, कुणि वर्णावें त्यांच्या गुणरूपां
मदनसख्या त्या अवघ्या होत्या केवळ अनुरूपा
अमृतकर तो चंद्र, तयाच्या करांत देतां कर
स्वर्गसुखाचा पडला पाउस दक्षकन्यकांवर
वेदाहुनही परी पुरातन सत्य असें कांते
अतिसौख्याच्या उदरीं अचानक दुःख जन्म घेतें
विहार करितां दक्षसुतांसह सौख्यें गगनांगणीं
आवडती अति झाली चंद्रा एकच ती रोहिणी

— २ —

चंद्र...		रोहिणी रोहिणी, शीघ्र चाल स्वामिनि
मेघमंडपीं बसूं, उभय दूर जाउनी

रोहिणी...		असें कसें, असें कसें, भगिनी सर्व मागुती
थांब थांब म्हणत त्याहि, दुरुन साद घालिती

नक्षत्रांगना...		[ दुरून ] रोहिणी, रोहिणी...

चंद्र...		विशालतेहुन विशाल ऐसें गगन विहारा मिळे
प्रणयाचें परि सौख्य सखी कां एकांताविन मिळे
चल मेघांच्या श्याममंडपीं करुं दोघें कूजन
प्रेममीलनीं नको आडवा अवकाशाचा कण
नको तेज हें, नको गगन हें, नको प्रीतिची सभा
तुझिया माझ्यामधें नसावा तेजःकणाहि उभा

रोहिणी... भगिनींशीं सवतभाव साधुं मी कसा, नाथा, साधुं मी कसा ?

चंद्र... तर मी घेउन जोग रोहिणी, जातों कैलासा
सुमनास्तव मीं वरिली शाखा
मोत्यासाठीं वरिल्या शिंपा
शुक्तिमालिका कंठीं घालुं, आग्रह हा कैसा ? जातों कैलासा

पत्निधर्म संभाळ पाळ वा भगिनीधर्मातें
तुझ्यावांचुनी अन्य सखी या नाहीं चंद्रातें

रोहिणी... हेंच का अबलांच्या दैवीं
सौख्यानिर्मिती सतत कुणाच्या दुःखांतुन व्हावी ?
पिता शैशवीं सुता वाढवी
प्रेमामृतरस माय चाखवी
त्या दोघांच्या विरहें वधुतें पतिप्राप्ती व्हावी
सौख्य घ्यावया पतिप्रीतिचें
वैर करावें का सवतींचें ?
त्यांचीं हृदयें पिळुनी कां मीं सोमसुधा प्यावी
हेंच का अबलांच्या दैवीं ?

चंद्र... विचार कसला करिशि रोहिणी तृषा मला लागे
अधिर प्यावया रूप तुझें मी मनसा, सर्वांगें
चल मेघांच्या मंडपिं अथवा सोड सर्व आस
एक मला तूं हवीस अथवा दूर न कैलास.

रोहिणी... येतें येतें प्राणवल्लभा

पति... चंद्र रोहिणी दोघें लपलीं श्यामलता ये नभा
बघतां बघतां परी फिकटली नक्षत्रांची प्रभा...

पति... स्वर्गंगेच्या तीरीं बसुनी रोहिणिच्या भगिनी
परस्परांशीं बोलुं लागल्या स्फुंदुनि वा रडुनी
समदुःखी त्या सहज जाणिती दुसऱ्याच्या भावां
त्या साऱ्यांच्या मनांत दाटे रोहिणिचा हेवा
रडूं दाटल्या वदनें अस्फुट बोलतसे कोणी

अश्विनी... रोहिणी ! रोहिणी ! रोहिणी !

भरणी... जाहलें काय गडे अश्विनी ?

अश्विनी... गेलीच रोहिणी घेउन नाथां संगें
तोडिले तियेनें अपणांमधले धागे

कृत्तिका... ती बहीण कसली वैरिण झाली बाई
सौभाग्य भोगणें दैवीं उरलें नाहीं...

मघा... दैवास दोष कां उगा कृत्तिके देसी,
भगिनीच वैरिणी ठरली जेथें ऐसी

अश्विनी... एकदां विचारूं निज भगिनीतें आतां
कां वेड लाविलें तूंच आमुच्या नाथा ?

मघा... ती रूपगर्विता पाणउतारा करुनी
देईल उत्तरां तया विचारा म्हणुनी

अश्विनी... हें काय बोलणें मघे, तुझें गे बाई
दुःखास औषधी जगांत कां या नाहीं ?

मघा... औषधी जयाच्या करें जगावर फुलती
त्यागितां तयांनीं उपाय कुठले उरती ?

कृत्तिका... कां शोक अकारण हा करितां
रक्षिता आपणां दक्षपिता

चला जाउं गे जनकगृहातें
सांगूं अवध्या गृहकलहातें
करुणा त्याविण येइ कुणातें
ऐकुं दे तया ही शोककथा...

सर्वजणी... जाउं या चला, जाउं या चला
सर्वशक्तिमान वीर जनक आपुला

पति... म्लानवदन त्या तेजवती मग पितृगृहीं आल्या
सन्मुख दिसतां पिता, सुता त्या अधोवदन झाल्या

दक्ष... अशा अचानक कां ग आलां ?
मलीनवसना, गलितमेखला !
कां ग माना अशा वळवितां !
कां चुळबुळतां, काय स्फुंदतां ?
कुशल असे ना मम जामाता ?
सौख्य असे ना घरीं तुम्हांला ?
बोल कृत्तिके, बोल अश्विनी
तेजस्विनि ती कुठें रोहिणी ?
आलां केवीं तिला सोडुनी ?
काय दुःख तें सांगा मजला
अशुभ असे कां कांहीं वार्ता ?
नित्य दिसे मज तुमचा भर्ता
तुम्हां पाहतों नभीं विहरतां
मूक उभ्या कां, बोला बोला

कृत्तिका... काय सांगणें तुम्हां तात घात जाहला
सनाथ या सुता तरी, अनाथ आज जीवनीं
धीर या मनांतला, नीर होय लोचनीं
सुरू न होय गीतिका, तोंच सूर भंगला
नाथ घात साधितां, तात, सांगणें कुणा ?

तात गेहिं आश्रिता,    कुमारिका अम्ही पुन्हां
सुदूर स्वप्नसा उरे,    शशांक तो नभांतला
पतिव्रता व्रतस्थ या,    पतीच होय पारखा
कशास निष्ठुरास त्या    अर्पिल्यात कन्यका
त्यागिलें तयें अम्हां,    बंध नाहिं राहिला

दक्ष... तुम्ही कां झाला परित्यक्ता ?

सर्व नक्षत्रांगना... हो राजेंद्रा, देवच तुडवी पायतळीं भक्तां
उरे रोहिणी एकच त्यांना राज्ञी अभिषिक्ता

दक्ष... (संतप्त) अग्निसाक्षी केला ज्यांचा मंत्रासह स्वीकार
त्या भार्यांचा त्याग कराया पतीस ना अधिकार
कुठें तो आहे विश्वकलंक
तप्त शरासम शापच माझा करील त्यातें डंख

पति... कोपुनिया तो झरझर चढला चढला हिमशिखरीं
तोंच दृष्टीला पडे सुधाकर संगें नव नवरी
प्रसन्न मुख त्या जामातातें बघता सखिसंगें
कंपित झालें प्रजापतीचें अंग अंग रागें
रागामधुनी अविचाराचा उसळे भीषण वात
त्या वातासह शाप दुमदुमे दक्षाचा गगनांत

दक्ष... धर्मोच्छेदक, असत्यवक्ता, जाणिसि ना तूं नय
हे चंद्रा ! तुज जडो अखंडित दुर्धर ऐसा क्षय...

— ४ —

चंद्र... जातों विपिनीं मी राणी
शाप दिला जो तुझ्या पित्यानें अजुन जळे कानीं

रोहिणी... येउं द्या चंद्रासह रोहिणी

चंद्र... अनुसरसी मज कशास वेडे, नयनीं कां पाणी
एकटीच ही तनु विरूं दे झिजत तपःध्यानीं

रोहिणी... येउं द्या चंद्रासह रोहिणी
वृक्षासंगें नांदतीच ना सुमवेली रानीं

चंद्र... या वृक्षाचा वसंत सरला, शिशिर जाहला सुरू
झिजतां झिजतां समूळ पडणें उन्मळुनी हा तरू

रोहिणी... उन्मळला तरु तरी आलिंगन सोडित नाहीं लता
सुखांतिका वा शोकांतिक हो उभयांची ही कथा

● ● ●

पति... जिथें न तरुवर, जिथें न निर्झर, अशा मरुस्थानीं
तपास बसला शशांक तेथें, पद्मासन धरुनी
सुवंशजा ती सती रोहिणी पतीनिष्ठ जाया
अबोल थांबे चंद्रतनु वर, करुनी निजछाया—
क्षणाक्षणानें कणाकणानें झिजत चालला शशी
चंद्रविहिन पण अवनी झाली दु:खें वेडी पिशी
घटापटादिक विचार सोडुन चर्चा करिती मुनी
पर्णहीनशा वृक्षाखालीं धरणीवर बसुनी

मुनि... धरेना पालवी वृक्षाला
काय हा प्रलयकाल आला
चंद्रविहिन या काळ्या रात्रीं
शृंगाराविण शुष्क धरित्री
वृद्धा दिसती, कोमलगात्री
फुटेना कंठच वीणेला

जळांत असुनी सुकल्या कुमुदिनी
सूर न उरले भ्रमर गुंजनीं
नुरे रसिकता रूपयौवनीं
थांबल्या धुंद मदनलीला......
शृंगाराविण कुठलें कूजन
कूजनविरहित कसलें मीलन

जनन थांबलें, जर्जर यौवन
मनूचा वंशच ओसरला......
वनस्पतींची वाढ थांबली
मुळें औषधी धरेंत जळलीं
रुग्णांना नच आशा उरली
सोहळा हरिताचा सरला......
कसलीं ज्ञानें, कसलें दर्शन
कुंठित झालें अवघें जीवन
स्तिमित चराचर चंद्रावांचुन
कुठें औषधीपती लोपला......

रोहिणी... सख्यांनो मुनि वचनें ऐका
अपुल्यासाठीं विश्वच अवघें जळुन जाउं द्या कां ?
तुम्हां दुरावे तुमचा भर्ता
जगा दुरावे परि सुखकर्ता
स्वतास विसरा जगताकारितां
अखिल जगाची दशा करुण ही निज नयनीं देखा

भरणी... रोहिणी, सांग करावें काय ?

रोहिणी... माझ्यासह या, जाउन धरुं या निजजनकाचे पाय

— ५ —

साऱ्या नक्षत्रांगना... तात, द्या नाथांना उःशाप !
आम्हां दग्ध करी अनुताप !
आजन्म आम्ही राहूं कुमारी
सुख नांदावें जनसंसारीं
पुन्हा उगवुं द्या चंद्र नभावरी
आवरा लेकींस्तव संताप...

दक्ष... रोहिणी सांग कुठें तव पती

रोहिणी... मरुस्थळीं लावून समाधी झिजत बैसले यती

दक्ष... अरे रे कोपी तरि मी किती

रोहिणी... चळावें, ताता, शीघ्रगती...

• • •

चंद्र... हे सहस्रलोचन, किती अजुन जीवन ?
एक थेंब अश्रुचा, एक संपतो क्षण
एक थेंब अश्रुचा, मिळे दुजाहि घेउन
धार एक वाहते, सर्व दुःख घेउन
धार एक वाहते, मिळे धरेंत जाउन
एक कोंब वाढतो, दुःखबीज फोडुन
दुःख बीज फोडुन, रोप एक वाढलें
पर्णभार जाहले, कटुत्व अंतरांतलें
रोप एक वाढलें, वृक्षरूप घेउन
एक थेंब अश्रुचा, एक संपतो क्षण

दक्ष... द्यावया आलों नवजीवन

नक्षत्रांगना... नाथ हो उघडा निजलोचन

दक्ष... कुमुदबांधवा, उदास सृष्टी झाली तुजवांचुन
विश्वासाठीं पुनरपि तुज मी देतों संजीवन
क्षयार्थ तुझिया मीच घडवितों माझा पुण्यक्षय
पुन्हा प्रकाशित रहा नभीं तूं भार्यांसह अक्षय

चंद्र... मी अपराधी, नका करूं हो निज पुण्याचा व्यय
आत्मानंदीं रमलों मी, मज योग्य असे हा क्षय

रोहिणी... उभा ठाकता सर्वनाश कवि त्यजिती अर्धें फल
अर्धमास द्या निज नाथातें पूर्वाकृति निर्मल
पुण्यसंचिता अर्ध्या ठेवा, अपुल्यापाशीं तात
अर्ध्या पुण्यें परत जगाला द्या हो तारानाथ

दक्ष... तथास्तु तथास्तु !
तुझ्यावांचुनी सुकून जगतीं गेली हिरवी माया
तुझ्या करांनीं पुन्हा फुलव त्या वनस्पती राया

अश्विनी... इथें हा हिरवा वृक्ष कसा ?
किती दिसांनीं दिसलें हिरवें, चाखिन मी तद्रसां
कडुकडु लागतें पान किती

दक्ष... निज नाथातें विचार, तो तर सर्वौषधिचा पती—

चंद्र... माझे अश्रू येथें गळले
ते धरणीनें प्रेमें गिळले
असह्य होतां वृक्षरूप हे होउन सळसळले
मम वेड्याच्या पापाकरितां
येइ अकारण यातें कटुता

वृक्षराज हा वाढविलासे माझ्या अश्रुंनीं
दिव्यौषधिसम सद्गुण असति या पानोपानीं
या वृक्षानें मम दुःखाची केली मज छाया
या वृक्षाचा कणहि जगावर जाइल ना वांया

दक्ष... तथास्तु !

रोहिणी... कडूपणांतुन गोड निपजलें जीवनांत नाथा
या वृक्षाच्या पानीं कां मग ठेवितसा कटुता ?

नक्षत्रांगना... आम्ही साऱ्या देऊं यातें असुचे तेजःकण
फुलें होउनी फुलवितील ते याचें कटुजीवन
सुगंधीत या येतिल सुमनें, आम्रमंजिरीसवें
वनस्पतींना वृक्षराज हा होवो लेणें नवें

दक्ष... दिव्यौषधिचा देव देइ ज्या उपकारार्थी वर
वृक्षराज तो कल्पतरू या ठरेल पृथ्वीवर

नक्षत्रांगना... तथास्तु तथास्तु......

पति... सत्य घडे तें आज, तेधवां वदला जें दक्ष
कडुनिंबक या पृथ्वीवरती, सखि अमृत वृक्ष
हाच दिवस तो ज्या दिवशीं त्या झाला वरलाभ
म्हणुनि पूजिती आणि भक्षिती आजच कडुनिंब

तैसें हें कटुनिंबक पुराण, तुवां ऐकिलें आदरें बैसोन
याचिया श्रवणें करोन, आयुरारोग्या लाभसी

* * *

# व्याध

## प्रथम खंड

[आकाशस्थताराग्रहांत संभाषणें चाललीं आहेत. कुणी गिरक्या घेतां घेतां गात आहे. कुणी स्थिर आसनावरून दुसऱ्या तिसऱ्याला हांक देत आहे. एक तारका मोठ्यानें गाऊं लागते.]

**एक तारका :** ग्रहताऱ्यांनो, जरा राहुं द्या शांत आपुला जथा
सांगती व्याध आपुली कथा

**सर्व तारका :** (एकदम शांत होऊन. व्याधाला उद्देशून)
हे तेजोमय, उच्चस्वरांनीं सांगा निजजीवन
नभोवाणि ही ऐकुं देत ना भूमिवरचे जन

**व्याधतारा :** (नम्रतापूर्वक)
निजतेजानें नभीं चमकतां तुम्ही सर्व तारा
आत्मग्रंथ मी काय दाखवूं उघडुनिया सारा
तेजाला मी कशी दाखवूं तमांतली गाथा?
क्षमा करा मज स्वस्थ राहूं द्या—लववितसें माथ

**एक तारका :** (विनंतीच्या स्वरांत)
अधिर ऐकण्या कथा आपुली पृथ्वी, तारा, ग्रह
मोडणार का नभोभूषणा, इतुक्यांचा आग्रह?

**व्याधतारा :** (विनयातिरेकानें)
अबोल, त्याला बोलवितां कां श्रोतेजनहो वृथा?

**तारका :** (व्याधाचा 'हो' कार गृहीत धरून)
ऐका, व्याध सांगती कथा...

(शांतता. नंतर हलकें हलकें एखादें तंतुवाद्य वाजूं लागतें. अन्य वाद्यांचे स्वर त्यांत गोळा होतात. संगीत भरदार होतें आणि...)

**व्याधतारा :** भूमिवरचे जन मज म्हणती व्याधाचा तारा
व्याधच होतों मानवलोकीं, आतां अवधारा
(परत लहानसा संगीत-खंड)

**व्याधतारा :** व्याध मी विंध्याचलवासी
निघालों सहज पारधींसी ॥ ध्रु० ॥

पारध माझें थोर प्रलोभन
हिंसा हें तर माझें जीवन
अचुक तीर मी मारित होतों उडत्या पक्ष्यांसीं.

(व्याधाच्या आत्मनिवेदनाबरोबर तें तें दृश्य केवळ संगीतानें सूचित केलें जातें.)

असाच तुडवित डोंगररानें
नकळे आलों किती योजनें
दुरुनि कांहिंसे नाद अबोधच भिडले कानांसीं.

(पार्श्वसंगीतासह कांहीं अंतरावरून आल्यासारखा ' रुद्र '-पठणाचा सांघिक ध्वनि येतो. व्याधाचें निवेदन चालूच आहे.)

त्या नादाच्या अनुरोधावर
पुढें चाललों थोडा भरभर
शिखर मनोहर दिसलें अवचित माझ्या डोळ्यांसीं

(संगीतासह रुद्रध्वनि नजिक आल्याचें भासमान होतें.)

बन वेलींचें दाट दाटलें

(डहाळ्यांची कडकड, पक्ष्यांचे साद, रुद्र साद.)

शिवमंदिरसें आंत वाटलें
मंडुकसे स्वर काढुन ब्राह्मण म्हणती मंत्रांसी

ओतित होते धार शिवावर
मी न थांबलों तेथें पळभर
ढळूं लागला दिवस म्हणुन मी लागे मार्गासी
मृदंग झांजा यांच्या मेळीं
गातच होती मूढ मंडळी
घरदारांतें सोडुन होते अळवित धोंड्यासी (हास्यध्वनि)

(प्रथम मोठा आणि नंतर हळूहळू कमी होत जाणारा भक्तजनांचा अभंग. यावर जणू व्याधानें मार्गक्रमण केलें.)

भक्तजन : भाळीं अर्धचंद्र, माथीं शुभ्र गंगा
लिंपिलें सर्वांगा, चिताभस्म
गळां सर्पमाळा, ल्याला व्याघ्रांबर
शिव तो शंकर, सत्य तोचि
शंख, शिंगनाद, गर्जे शिवगण
पायीं भक्तजन, ओळंगिती
भोळा सदाशिव, पावतो भक्तासी
उद्धरीं दीनासी, नीलकंठ
हरहर शंकर सांबसदाशिव, सांबसदाशिव त्रिपुरारी

## द्वितीय खंड

व्याधतारा : उरला सुरला प्रकाश विरला विरला स्वर हरहर
सरोवराच्या एका तीरीं आलों मी तोंवर
हांसत होतों मनोमनीं मी त्या भजनालागीं
उगीच होते केकाटत जन भलत्या उद्योगीं
करित कुचेष्टा, हरहर बोलत, चढलों वृक्षावर
न्याहळित बसलों पारधीस मी लवल्या शाखेवर
पानें येतां जरा आडवीं खुडुनीं तीं सारीं
टाकित होतों वृक्षाखालीं सहजचि अंधारीं—

( झाडावर बसलेला व्याध गमतीनें हरहर शब्द व अभंगांतील कांहीं ओळी म्हणत राहतो. यावर कांहीं क्षण जातात. )

एक याम सरली रजनी
आली जलपाना हरिणी
( श्वापद पाण्याशीं आल्याचा आवाज )
बाण लाविला, धनू ओढिलें
मानव वाणी काढुन भीता हरिणी मज बोले—

**हरिणी :** ( आर्त स्वरानें )
एक तुला विनवणी,
तृषाकान्त, ही मारुं नको रे अवघडली गर्भिणी !
प्रसूतिसमय मम समीप आला
परत जाउं दे अशीच मजला
जन्मा घालुन बाळ चिमुकला
पाहुन, चाटुन पळभर त्याला येतें मी परतुनी—!

**व्याध :** विश्वास धरावा कुणीं ?
मरणभयानें देशि काय तूं व्याधा हुलकावणी—?

**हरिणी :** ( निश्चयी स्वरांत )
शपथ शपथ कथितें व्याधा सत्य वचन मानी
बालकास ठेवुन येतें परत या ठिकाणीं
शास्त्र काय सांगूं तुजला शूर जीवघेल्या
धेनुकावधाहुन मोठें पाप बालहत्या
भीत नाहीं मृत्यूला मी, हेंच मरण रानीं
बालकास ठेवुन येतें परत या ठिकाणीं !

**व्याध :** ( निर्दयपणें )
ठेवुं कसा विश्वास ?
कोमल पाडस खाउन सोडिन घडलेला उपवास
घे शेवटचें पिउनी पाणी, घे शेवटचा श्वास
( दोरी ताणल्याचा आवाज )

हरिण : (अधिक आर्त स्वरांत)

आवर रे धनुबाण
मातेसंगें नकोस घेऊं बाळांचेही प्राण !

दिलें वचन मी जर ना पाळिन
सात पिढ्यांचीं पुण्यें जाळिन
मरणानंतर नरकीं लोळिन
लेकुरवाळा असशिल तूंही, शब्द एवढा मान...

व्याध : [ किंचित् द्रवून, अनिच्छेनेंच ]

मान कोप वा मान दया
प्रसूत होतां, परत झडकरी, मग करितों मृगया—

हरिण : (अत्यानंदानें)

होइ तूं चिरंजीव सदया
रात संपण्यापूर्वीं येल्यें खाचितच या ठायां—

(हरिणी दौडत गेल्याचा साद)

## तृतीय खंड

व्याधतारा : (परत निवेदन करतो)

भूतदयेनें हुकली पारध, तोडित मी त्रिदळें
तमांत निरखित वाट बैसलों मोजित घटिकापळें

(थोडा काल जातो. मग पाण्यांत पाऊल वाजल्याचा आवाज येतो.)

तोंच ऐकला बुद्‌बुद् ऐसा ध्वनी अकस्मात
दुसरी कोणी मृगी तृषार्ता शिरली पाण्यांत
बाण लाविला, धनू ओढिलें

मृगी : (आर्ततेनें)

नको बाण फेकूं व्याधा, कामपीडिता मी
दूर वनीं राहे माझा, पतीदेव स्वामी
एकवार परतुनि जातें
आलिंगनें त्याला देतें
मरायास येतें येथें, शपथ सांगतें मी

व्याध : (तिचें खरें वाटून)

जा बाई जा, मीहि जाणतों देहाची आंस
तृप्त होउनी त्वरित परत ये याच ठिकाणास

मृगी : चिरंजीव होई व्याधा, चिरंजीव होई
पतीदेव पुजून येतें परत याच ठायीं—

(मृगीचे परतणारे पायरव येतात. थोडा काल संगीतच घुमत राहतें.)

व्याध : (परत निवेदन करतो.)

माघमासिचा कृष्ण पक्ष अन् डुलती तरुराजी
डुलत हांसली पाहुनिया ही मूढ दया माझी
(संगीतखंड)
खसपसलीं तों पुनश्च पानें, हले उभी छाया
ऐटदार कुणी मृगच पातला, ही तिसरी मृगया
बाण लाविला, धनू ओढिलें
मानववाणी काढुनिया तो मृग मजसी बोले...

मृग : (आर्ततेनें)

क्षणभर दे जीवदान
पतिव्रतांसीं येतों पुसुनी, घेई मग तूं प्राण—!

व्याध : (आर्द्र स्वरांत)

आठवली मज गृहराणीची एकनिष्ठ माया
धनू ठेविलें, "जाइ मृगा, ये आलिंगुनी जाया."

अनुक्रम 29025 दि. 31/...
क्रमांक 13... नों: दि: 28/...

**मृग :** (आनंदानें)

विजयी हो वीरा,
निजजायांना पुसुनी येतों येथें माघारा— !

(मृग निघून गेल्याचा आवाज दीर्घ संगीत खंड)

**व्याध :** परतुन गेलीं सर्व सावजें, अरुणोदय झाला
सुवर्ण तेजासंगें रानीं आम्रगंध आला

दिसूं लागलीं सरोवरावर फुलतीं कमलफुलें
तळीं पाहतां शिवलिंगांवर जमलीं बिल्वदलें
चाळा म्हणुनी रात्रभरीं मीं बिल्वदलें खुडिलीं
तळीं शिवावर पडलीं सारीं, शिवपूजा घडली
रातभरीं मज उपास घडला त्या तरुच्या माथीं
पुनश्च आली एक कुरंगी, धनु उसळे हातीं
बाण लाविला, धनू ओढिलें
मानववाणी करुनि कुरंगी ती मजसी बोले.

**कुरंगी :** (काकुळतीनें)

नको शर मारूं !
दूर राहिलें पाडस त्याला कैसी हांकारूं ?
क्षणभर येथुन परतुन जातें
स्तन बाळाला देउन येतें
सुखें येउं दे तीर तुझा मग मजसीं संहारूं !

**व्याध :** (मुळींच आढेवेढे न घेतां)

जा बाई जा, पाजुन येई तुझिया चिमण्यासी,
सर्व पारधी सोडुन दिधल्या मारूं कां तुजसी ?

**कुरंगी :** (आनंदानें)

होइ सदा विजयी
स्तन बाळाला देउन येतें परतुन या ठायीं
(ती गेल्याचें सूचित करणारा आवाज. संगीतखंड)

# चतुर्थ खंड

व्याध : वृक्षावरुनी खालीं आलों, पाहुनि सूर्योदया
कसलीं येती परत सावजें, कसली ती मृगया
दुडदुड आलीं तोंच समोरुन मृगबाळें चार
मृग तो आला, तीन मृगी त्या, अवघा परिवार

हरिणी : ( व्याधासमोर येत )

प्रसूत झालें, बाळ जन्मलें, शपथ जाहली पुरी
व्याधा मार मला सत्वरी !

मृगी : ( तिला आडवी येत )
मोठ्या तुम्ही !—दूर व्हा तुम्हि व्याधा मज मारी
शेवटचा मीं भोग घेतला नुकता कांतारीं

कुरंगी : ( तिला थांबवीत, व्याधास उद्देशून )
त्या दोघींना तान्हीं बाळें, मार मला व्याधा

पाडसें : ( आत्मार्पणाच्या इच्छेनें पुढें येतात )
थोरांसाठीं सान मरावें नीतिधर्म साधा

मृग : ( त्या सर्वांच्या पुढें येऊन गंभीर स्वरांत )

नका सख्यांनो, नका मुलांनो तुम्ही नका जाऊं
( व्याधास ) सर्वांसाठीं छेद मला तूं, सांग कुठें राहूं ?

व्याध : ( परत निवेदन )

थक्कच झालों पाहुनि मी तो जिवंत प्रेम लळा
प्रेमि जनांची पारध करणें छंद किती हा खुळा
अश्रापांची नकोच पारध विचार ये ध्यानीं
तोंच जाहला डमरुनाद; ये मधु मंगलवाणी

( डमरूनाद आणि विजेचा आवाज एकमेकांत मिसळून गरजतात बिल्वपूजित लिंगापासून शंकराची सदेहाकृति प्रगट होते. )

**श्रीशंकर :** बिल्वदलांनीं पूजिलेंस मज, जपलें नाम तुवां
उपोषणासह जागरणासह, शिकला मंत्र नवा

सर्वांभूतीं स्वतःस बघणें हेंची शिवदर्शन
जीवदान तूं दिलें मृगांना हेंची शिवपूजन

दयादान हें तुझें पारध्या, पडलें सत्पात्रीं
कृष्णपक्षिंची चतुर्दशी ही ठरली शिवरात्री

सार्थक झालें तव जन्माचें बैस व्योमयानीं
' व्याधतारका ' म्हणुनी बघतील जन तूंतें गगनीं

मृगराजा हा, तीन कुरंगी, हीं बाळें सान
नीलाकाशीं चमकत राहातिल मृगतारा म्हणुन

**व्याध :** ( गहिंवरून )
शंकरा उद्धरिला पापी !

**शंकर :** तुझ्यांतला शिव झाला जागा, तूं कसला पापी !

**व्याध :** शिवलीलामृत काय म्हणूं ही घटित कथा वस्तु—!

**शंकर :** तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु !

**सर्वजण :** ( सांघिक गान )
जयजय सांब चंद्रमौली
शोभतो ज्ञाननेत्र भालीं ॥ धृ० ॥

भस्मविभूषित नीलग्रीव हर
सत्यसदाशिव सर्पमालधर
अंबिका अर्धांगी काली—

नमः शिवाय, नमः शिवाय, नमः शिवाय.

व्याध : सांगुं नये तें सांगितलें मीं प्रश्न तुम्ही केल्या—
असाच झाला ' मुनी वाल्मिकी ' दग्धपाप वाल्ह्या

तारका : कथा नव्हे ही तुम्ही घातला अमृत रस श्रवणीं
या सत्यानें सुंदर झाली व्याधासह धरणी

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
स्थळप्रत
अनुक्रम ... वि:
क्रमांक ... नों: दि: